




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१२ ■ रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







# भक्ती, सेवा अन् शिस्तीचा अनुपम सोहळा !

## ▶▶ प्रकटोत्सवाला जनसागर उसळला ▶▶ राज्यभरातून आल्या 750 च्या वर भजनी दिंड्या

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**शेगाव:** श्री संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त आज शेगाव नगरीत भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचा महासोहळा अनुभवायला मिळाला. पहाटेपासूनच 'अनंत कोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज श्री संत गजानन महाराज की जय!' आणि 'गण गण गणात बोते!' या जयघोषाने मंदिर परिसर आणि संपूर्ण संतनगरी भारावून गेली. लाखो भाविकांनी महाराजांच्या चरणी मस्तक ठेवत कृतार्थतेचा अनुभव घेतला.

आजचा सोहळा केवळ उत्सव नव्हता, तर गजानन विजय ग्रंथातील अमृतवचने जणू प्रत्यक्ष अनुभवण्याचा दिवस ठरला. मंदिर परिसरात आणि दिंड्यांमध्ये वारंवार या ओळींचा उच्चार होत होता. दर्शनासाठी तासनतास रांगेत उभे असलेले भाविकही नामस्मरणात रमलेले दिसत होते. गाभाऱ्यात दर्शन होताच अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आजचा प्रगट दिन सोहळा शेगावात भक्तीचा महाकुंभ ठरला श्रद्धा, सेवा आणि समर्पणाचा दिव्य अनुभव देऊन गेला.

अकोला-शेगाव मार्गावर मागील दोन दिवसांपासून फक्त आणि फक्त भगवे ध्वज आणि 'गजानन' नामाचा गजर ऐकू येत आहे. हजारो वारकरी, हातात टाळ-मृदंग घेऊन आणि पायी दिंड्यांसह आपल्या लाडक्या 'माऊली'च्या दर्शनासाठी व्याकुळ होऊन पोहोचले आहेत. तासनतास दर्शनबारीत उभे असूनही, चेहऱ्यावर थकवा नाही तर केवळ दर्शनाची ओढ दिसत आहे. गाभाऱ्यात महाराजांचे रूप पाहताच अनेक भक्तांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले; 'विठ्ठलाच्या भेटीला जसा वारकरी धावतो, तसाच अनुभव आज शेगावात येत आहे,' अशी भावना एका भाविकाने व्यक्त केली. लाखो भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने अत्यंत चोख व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शनानंतर प्रत्येक भक्ताला तृप्त करणारा महाप्रसाद विनामूल्य वितरित केला जात आहे. शिस्तीचे पालन करत लाखो भाविक या प्रसादाचा लाभ घेत आहेत. वाढती गर्दी लक्षात घेता ८ फेब्रुवारी रोजी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, जेणेकरून प्रत्येक भक्ताला दर्शन घेता येईल. खामगाव-शेगाव मार्गावरील अतिक्रमण हटवल्यामुळे पायी येणाऱ्या भाविकांचा मार्ग सुलभ झाला आहे.



'गण गण गणात बोते'च्या अखंड जयघोषात दुमदुमली संतनगरी
प्रगट दिनी शेगावात उसळला श्रद्धेचा सागर
'योगीराज आले, आनंद झाला... शेगावी भक्तीचा मळा फुलला !'

'जगाच्या करण्यास उद्धार गजानन रूपे अवतार''शेगावी
मागमासी वैद्य सप्तमी ज्या दिवशी हा उदय पावला ज्ञानराशी
पदनताते तारावया'

'गण गण हे त्यांचे भजन हमेशा चाले
म्हणून लोकांनी दिले अभिधान गजानन हे तयाला'

'आता हीच विनंती तुम्हा अवघ्या भाविका प्रति अत्यंत
असू द्या घ्यावी प्रीती श्री गजाननाची चरणी'



### पोलिसांचा तगडा बंदोबस्त

श्री नगरीसह वारी मार्गावर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तसेच फिरते पथकही वेळोवेळी परिस्थितीची पाहणी करीत होते. एरवी कडक आणि शिस्तप्रिय पोलिस कर्मचारी मृदू भाषेत भाविकांना पुढे चला, गोंधळ करू नका, असे सांगत असल्याचे दिसून आले. कोठेच अनुचित प्रकार होऊ नये, याची ते विशेष खबरदारी घेताना दिसून आले.

### श्रींच्या पालखीचा परिक्रमा मार्ग

संत श्री गजानन महाराज मंदिर उत्तर द्वार (जनरेटर रुम जवळील) मधून बाहेर, महात्मा फुले बँकेसमोरुन, क्रांतीसूर्य ज्योतीराव फुले चौक, संत श्री सावता महाराज चौक, श्री हरिहर मंदिर, भीम नगर, तीन पुतळा परिसर, न प शाळा क्र. ०२, फुले नगर, श्री प्रगटस्थळ, सितामाता मंदीर, श्री लायब्ररी पुलावरुन श्रीं मंदिराचे पश्चिम गेटमधून श्रींचे मंदिर परिसरामध्ये परत.

विदर्भाचे आराध्य दैवत श्री संत गजानन महाराजांच्या १४८ वा प्रकट दिन सोहळा आज ८ फेब्रुवारी रोजी भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे. या सोहळयासाठी ७ फेब्रुवारीच्या पूर्वसंध्येला राज्याच्या कानाकोपऱ्यातून ७५० च्या वर भजनी दिंड्या दाखल झाल्या होत्या तर लाखो भाविकांनी पायी वारी करीत आपली भक्ती श्रीचरणी अर्पण केली. श्रींच्या नगरीत दाखल होणाऱ्या भाविकाला कोणती असुविधा होऊ नये, यासाठी प्रत्येक जण आपापल्या परीने सेवा देत होता. भाविक अन् सेवाधारी अप्रत्यक्षरीत्या आपल्यापासून इतरांना त्रास होणार नाही, यासाठी झटत होता. त्यात स्वच्छता, रांगेत कोणताच गोंधळ आणि आरडाओरड न करता श्रींचे दर्शन घेत होता. एकूणच भक्ती, सेवा आणि शिस्तीचा हा सोहळा अनुपम असाच वाटत होता.

भाविकांच्या मते, महाराजांचा अवतार हा केवळ एका काळापुरता नसून आजही भक्तांच्या जीवनात मार्गदर्शक प्रकाश आहे. महिला भाविकांची उपस्थिती विशेष लक्षणीय ठरली. ओटी, फुले, नैवेद्य आणि गजानन विजय ग्रंथ हातात घेऊन हजारो माता-भगिनी नामस्मरणात तल्लीन होत्या. अनेकांनी पारायण, जप आणि सेवा कार्यात सहभाग घेतला.

**'गजानन चरणी प्रेम करा, येणे तुमचा उद्धार खरा'**

नामघोष, दिंड्या आणि अखंड स्मरणात भजनटाळ-मृदंगाच्या गजरात दिंड्या शेगावात दाखल होत राहिल्या. भजनी मंडळे अखंड गात होती.



## राज्यसभेच्या सात जागांपैकी मविआला केवळ एकच जागा मिळणार !

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी


**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे स्वत: निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. मविआच्या सरकार वेळी उद्धव ठाकरे हे कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. त्यावेळी त्यांनी विधान परिषदेची निवडणूक लढवली होती. त्यानंतर ते विधान परिषदेवर गेले होते. आता त्यांच्या विधान परिषदेच्या सदस्यत्वाची मुदत १३ मे २०२६ रोजी संपत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे पुन्हा एकदा विधान परिषदेवर जाणार का हा प्रश्न निर्माण झाला आहे. तसा निर्णय उद्धव यांनी जरी घेतला तरी निवडून जाण्यासाठी संख्याबळाची समस्या त्यांच्या समोर असणार आहे. विधान परिषदेच्या जवळपास ९ जागा या मे महिन्यात रिक्त होणार आहेत. त्यात उद्धव ठाकरे ही आहेत. या जागा विधान सभेतून विधान परिषदेसाठी निवडल्या जाणार आहेत. अशा वेळी विधान परिषदेत मविआचा केवळ एकच उमेदवार निवडून येऊ शकतो. त्यामुळे अशा स्थितीत मविआचा उमेदवार कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे. उद्धव ठाकरे स्वत: निवृत्त होत असल्याने ते विधान परिषदेवर जाणार का हा खरा प्रश्न आहे. पण जरी त्यांनी तसा निर्णय घेतला तर मग त्यांना राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेसला पाठिंबा द्यावा लागणार आहे. तसे झाल्यास उद्धव ठाकरे विधान परिषदेवर जाऊ शकतात. अशा स्थितीत संख्याबळाच्या कमतरतेमुळे मविआची कोंडी होऊ शकते. उद्धव ठाकरेंना परिषदेवर जायचं झाल्यास राज्यसभेचं समीकरण जुळवावं लागेल.

## न्यू तापडीया उड्डाणपूल प्रकरण
# मुंबई उच्च न्यायालयाची सरकारसह रेल्वेला नोटीस

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**नागपूर:** अकोला शहरातील रखडलेल्या रेल्वे उड्डाणपुलाबाबत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेतली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने या प्रकरणी राज्य सरकार आणि रेल्वे प्रशासनासह सर्व संबंधित प्रतिवाद्यांना नोटीस बजावली असून, २ एप्रिल २०२६ पर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अशी माहिती वकिल ॲड. उज्वल देशपांडे यांनी दिली आहे. अकोल्यातील न्यू तापडिया नगर येथील रेल्वे गेट क्रमांक ३८ वर गेल्या सात वर्षांपासून उड्डाणपुलाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. यामुळे नागरिकांना होणारा त्रास आणि प्रशासकीय दिरंगाईविरोधात स्थानिक विधीज्ञ नरेंद्र बेलसरे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेवर ५ फेब्रुवारी रोजी प्राथमिक सुनावणी पार पडली. न्यायालयाने महाराष्ट्र सरकारचे सार्वजनिक बांधकाम मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयासह सर्व प्रतिवाद्यांना नोटीस बजावली आहे. सर्व प्रतिवाद्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी २ एप्रिल २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. राज्य सरकार आणि संबंधित विभागाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील यांनी नोटीस स्वीकारली आहे. इतर उर्वरित प्रतिवाद्यांना खासगीरीत्या नोटीस बजावण्याची परवानगी याचिकाकर्त्यांना देण्यात आली आहे. उड्डाणपुलाचे काम रखडल्याने अकोल्यातील दक्षिण भागातील वाहतूक विस्कळीत झाली असून, रुग्णवाहिका आणि शालेय बसना मोठा फटका बसत आहे. आता उच्च न्यायालयाने स्वतः या विषयात लक्ष घातल्यामुळे या पुलाचे काम लवकरच मार्गी लागेल, अशी आशा शहरवासियांमध्ये निर्माण झाली आहे.

# शिक्षकांना 'टीईटी'च्या मिळणार 6 संधी !
## प्रस्ताव परीक्षा परिषदेने शासनाला पाठविला



केंद्र शासनाच्या सीटीईटी वर्षातून दोनदा होतात. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी जास्तीत जास्त संधी मिळाव्यात म्हणून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे देखील वर्षातून दोन परीक्षा घेतल्या जातील. तसा प्रस्ताव शासनाला पाठविला आहे.

**- डॉ. नंदकुमार बेडसे,**
आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने आता २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील पहिली 'टीईटी' जूनअखेर- जुलै महिन्यात होईल. त्यानंतर याच वर्षातील नोव्हेंबरमध्ये दुसरी 'टीईटी' घेतली जाणार आहे.

२०२७-२८ या शैक्षणिक वर्षातील पहिली परीक्षा जूनमध्ये होईल; कारण ३१ ऑगस्टपूर्वी निकाल जाहीर करावा लागणार आहे. दुसरीकडे, ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या तीन 'सीटीईटी' होणार आहेत. १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने टीईटी सक्तीचा निर्णय घेतला आणि त्यासाठी दोन वर्षांची मुदतही दिली. ही मुदत ३१ ऑगस्ट २०२७ रोजी संपणार आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवर नियुक्त सर्वच शिक्षकांना, ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे त्यांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण व्हायचे आहे. मुदतीत पात्रता पूर्ण न करणाऱ्यांवर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामध्ये त्या वर्गांवरील तथा शाळांमधील मुख्याध्यापकांचा देखील समावेश आहे. दुसरीकडे, यापुढे शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ घेण्यासाठी देखील 'टीईटी' उत्तीर्ण असावे लागणार आहे. २३ नोव्हेंबरला झालेल्या 'टीईटी'त १२ टक्केसुद्धा उमेदवार उत्तीर्ण झाले नाहीत. या पार्श्वभूमीवर शिक्षकांना पुढच्या सहा मुदतीत 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अध्यापनाबरोबर शिक्षकांना स्वत:ला देखील अभ्यास करावा लागणार आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने दरवर्षी एकदाच 'टीईटी' घेतली जात होती, तसा शासन निर्णय आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना दोन वर्षांत पात्रता पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. ती मुदत ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत असणार आहे. या पार्श्वभूमीवर आता शासन निर्णय बदलावा आणि परीक्षा परिषदेला देखील वर्षातून दोनदा परीक्षा घेण्यास परवानगी द्यावी लागणार आहे. तसा प्रस्ताव परीक्षा परिषदेने शासनाला पाठविला आहे. त्यावर आता राज्य सरकारकडून तत्काळ मान्यता मिळणार का, याकडे राज्यातील पावणेदोन लाख शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# एसटी बस सेवा विस्कळीत होण्याची शक्यता

## कर्मचाऱ्यांकडून सरकारला 3 दिवसांचा 'अल्टिमेटम'



प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**नागपूर:** राज्यभरातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून आलेल्या रकमेबरोबर वाढीव वेतनाचा फरक देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, संबंधित रक्कम न दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. येत्या १० तारखेपर्यंत वाढीव वेतनाचा फरक न दिल्यास रितसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही श्रीरंग बरगे यांनी दिला आहे.

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनासाठी साधारण ४७५ कोटी रुपये खर्च येतो. त्यासोबतच वाढीव वेतनवाढीचा फरक देण्यासाठी दरमहा सुमारे ५८ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद आवश्यक आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीच्या फरकासाठी राज्य सरकार दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये देईल, अशी घोषणा १३ ऑक्टोबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या सर्व श्रमिक संघटनांच्या बैठकीत करण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून ही रक्कम राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला मिळालेली नाही.

त्यामुळे राज्य सरकारची अब्रू वाचवण्यासाठी महामंडळाने स्वतःच्या तिजोरीतून दोन महिन्यांचा वाढीव वेतनफरक कर्मचाऱ्यांना अदा केला. या महिन्यात तीन महिन्यांची एकत्रित ११६.६९ कोटी रुपयांची रक्कम देण्यात यावी, असे पत्र महामंडळाने २० जानेवारी २०२६ रोजी राज्य सरकारकडे पाठवले होते. तरीही ही रक्कम न आल्याने व्यवस्थापनाने वाढीव वेतनाचा फरक कर्मचाऱ्यांना देऊ नये, असा निर्णय घेतला असून आज कर्मचाऱ्यांना फरकाविना वेतन देण्यात आले. एकीकडे महामंडळावर सुमारे ४२०० कोटी रुपयांची वैधानिक देणी थकीत असताना, दुसरीकडे कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनाचा हप्ता न देणे ही सरळ अवहेलना असल्याचे बरगे यांनी स्पष्ट केले. येत्या तीन दिवसांत वाढीव वेतनफरकाची रक्कम न मिळाल्यास रीतसर नोटीस देऊन एसटी कर्मचारी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडतील, असा ठाम इशाराही त्यांनी दिला आहे.

## विलीनीकरणाची एवढी घाई का; आ. शेळके यांचा सवाल

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**पिंपरी-चिंचवड :** दिवंगत अजित पवार यांच्या निधनाला आज ११ दिवस उलटले असले, तरी त्यांच्याशी संबंधित दावे-प्रतिदावे अजूनही सुरू आहेत. अजित पवार यांच्या अपघाताबाबत असो किंवा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या संभाव्य विलीनीकरणाचा विषयावर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. या पार्श्वभूमीवर मावळचे आमदार आणि दिवंगत अजित पवार यांचे कट्टर समर्थक सुनील शेळके यांनी शरद पवारांच्या पक्षाच्या भूमिकेवर थेट प्रश्न उपस्थित केले आहेत.




सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात 'कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र' अभियानाचा शुभारंभ

**अमरावती:** कुष्ठरोग हा शाप नसून तो एक उपचारसाध्य आजार आहे, हा संदेश जनमानसांत रुजवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या उपस्थितीत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती आणि 'कुसुम' कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी (ता. अमरावती) येथे नुकताच हा कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुष्ठरोग निवारणाची सामुहिक शपथ घेतली. श्रीमती महापात्र यांनी स्वतः अंजनगाव बारी परिसरातील वीटभट्ट्यांवर जाऊन तेथील कामगारांशी संवाद साधला. त्यांनी तपासणीसह कुष्ठरोगाची लक्षणे ओळखण्याबाबत कामगारांचे समुपदेशन केले. कुष्ठरुग्णांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे आणि त्यांच्याबद्दलची अंधश्रद्धा दूर व्हावी, हा या 'स्पर्श' अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या पंधरवड्यामध्ये जिल्हाभरात विविध उपक्रम राबवून या आजाराविषयी शास्त्रोक्त माहितीचा प्रसार केला जाणार आहे.

# दोन विधीसंघर्ष बालकांना घेतले ताब्यात; दोन देशी कट्टे व दोन जिवंत काडतूस जप्त

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी




◆ अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरात अवैध्यरीत्या शस्त्र बाळगणा-या इसमांवर कारवाई करण्याबाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

दि. ०७/०२/२०२६ रोजी गुन्हेशाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात घातक शस्त्राबाबत मोहीम राबवली असता पथकाला गोपनिय माहीती मिळाली की, पो.स्टे. बडनेरा हददीतील शिवाजी नगर परीसरात दोन विधी संघर्ष बालक हे अग्नीशस्त्र सारखे घातक शस्त्र कंबरेला लावून फिरत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून गुन्हे शाखेच्या पथकाने शिवाजी नगर नवी वस्ती बडनेरा रेल्वे लाईन कडे जाणा-या कच्च्या रोडवर जावून मोठ्या शिताफीने त्यांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातून दोन नग देशी कट्टे (पिस्टल) व दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. नमूद दोन विधी संघर्ष बालक यांचे विरूध्द पोलीस स्टेशन बडनेरा येथे कलम ३/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५, मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव -दोन विधीसंघर्षग्रस्त बालक रा. बडनेरा अमरावती.जप्त करण्यात आलेला मुददेमाल दोन नग देशी कट्टे (पिस्टल) कि.अं. ८००००/- रू, दोन नग जिवंत काडतूस (रांउड) कि.अं. १०००/- रू, असा एकुण ८१,०००-०० रूपये मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, विशाल वाकपांजर, नापोका मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, सागर ठाकरे, योगेश पवार, संदीप खंडारे, चेतन गुल्हाने, प्रभात पोकळे यांनी केली आहे.

# संत गजानन महाराज प्रगट दिन भक्तीभावाचा महोत्सव; गण गण गणात बोते

◆ अनंत कोटी ब्रह्मांडनायक, महाराजा धिराज, योगीराज, परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक, शेगाव निवासी समर्थ



सदगुरु श्री गजानन महाराज जेव्हा पावन तीर्थक्षेत्री शेगाव नगरीत प्रगट झाले, त्या क्षणापासून ही भूमी कृतार्थ झाली. महाराजांचे अवतरण हे केवळ एका संताचे प्रगट होणे नसून, करुणा, त्याग, तपस्या आणि भक्तवत्सलतेचा साक्षात अविष्कार होता. महाराजांचे संपूर्ण जीवन मानवजातीसाठी एक दिव्य व कालातीत संदेश ठरले आहे.

आज आपण शेगाव येथे महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतो. त्यानंतर महाराजांच्या कृपाशीर्वादाने पावन झालेल्या परिसरात नजर टाकली असता, तेजस्वी व भव्य स्वरूपातील महाराजांचे फोटोदर्शन होते. मात्र महाराजांच्या बालरूपातील छायाचित्रात दिसणारे उष्टे अन्न ग्रहण करणारे, अलिप्त व अवलिया स्वरूप आपल्याला वैराग्य, अहंकारशून्यता, समत्व आणि पूर्ण समर्पणाची शिकवण देऊन जाते. ऐहिक सुख-दुःखांपासून अलिप्त राहून परमेश्वरभक्तीत तल्लीन राहण्याचा आदर्श महाराजांनी आपल्या आचरणातून घालून दिला. ज्या शेगाव नगरीत महाराजांनी आपल्या पावन चरणांचा पदस्पर्श केला, त्या भूमीला त्यांच्या कृपाशीर्वादाने अलौकिक महत्त्व प्राप्त झाले. आज त्या तीर्थस्थळी महाराजांच्या कृपेने लाखो भाविक भक्तगण पोटभर प्रसाद ग्रहण करून धन्यता मानतात. येथे कोणीही उपाशी राहत नाही, कोणीही निराश परत जात नाही—हीच महाराजांची अपार करुणा व दिव्य लीला आहे. ङदोन्ही हात जोडून 'जय गजानन' करतो भाविकांसाठी नियोजन करणारे सन्माननीय ट्रस्टी व सेवेकरी यांची सेवा खरोखरच शब्दातीत आहे.

संत सदगुरु श्री गजानन महाराजांच्या कृपाशीर्वादाने शेगाव नगरीचा सर्वांगीण विकास झाला आहे. येथे सेवा, श्रद्धा आणि परिश्रम यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. छोटे-मोठे व्यावसायिक, सेवेकरी, साधक व भक्त प्रामाणिकपणे आपला उदरनिर्वाह करीत असून, भाविक भक्तगण हा आदर्श स्वीकारून धन्यता मानतात. यामागे महाराजांचीच कृपा असल्याची दृढ भावना प्रत्येकाच्या मनात आहे. आज शेगाव हे केवळ तीर्थस्थान न राहता श्रद्धा, सेवा, समाधान आणि समत्व यांचे पवित्र केंद्र बनले आहे.

महाराजांचे कार्य केवळ चमत्कारांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आपल्या आचरणातून मानवतेला जो संदेश दिला, तो आजही तितकाच मार्गदर्शक आहे—

सदाचार ठेवा, अहंकार टाळा, निःस्वार्थ सेवा करा आणि नामस्मरणात जीवन व्यतीत करा.

या पावन प्रगट दिनानिमित्त आपण सर्वांनी संत सदगुरु श्री गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांच्या शिकवणीनुसार आदर्श जीवन जगण्याचा संकल्प करूया. महाराजांच्या कृपाशीर्वादाने सर्वांच्या जीवनात आनंद, समाधान, आरोग्य आणि भक्तिभाव नांदो, हीच प्रार्थना मी महाराजांच्या चरणी करीत आहे.

सर्व सन्माननीय भाविक भक्तगणांना जय गजानन! महाराजांच्या कृपा-आशीर्वादाने आपल्या सर्वांच्या मुखी सदैव हरिनाम राहो.

**संत गजानन महाराजांचा दास**
**उमेश महादेवराव ढोणे**
मोबाईल : ९०४९०६७३३१
महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव समिती
सह-आयोजक

# मेळघाटच्या डोंगरदऱ्यात रंगला जिल्हा प्रशासनाचा 'ट्रेकिंग' अनुभव

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

◆ ऐतिहासिक गाविलगड किल्ल्याची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी



**अमरावती:** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज, दि. ७ फेब्रुवारी रोजी गाविलगड किल्ल्याची पाहणी आणि पदभ्रमंती केली. त्यासोबतच जिल्हाधिकारी यांनी मोझरी पॉईट येथून गाविलगड किल्ला पायी चढण्याचा अनुभव घेतला. त्यांनी सुमारे सहा किलोमीटर ट्रेकिंग करत दरीतून चढण्याचा थरारक अनुभव घेतला.

जिल्ह्यातील प्रशासकीय कामाचा ताण हलका करण्यासाठी आणि निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे हा उपक्रम राबवण्यात आला. जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी या विशेष 'ट्रेकिंग' मोहिम घेण्यात आली. निसर्गाच्या कुशीत एक अविस्मरणीय प्रवास असलेला 'मेळघाट ट्रेकिंग अनुभव' या मोहिमेत सहभागी झालेल्यांना मेळघाटातील घनदाट जंगले आणि हिरव्यागार दऱ्यांचा थरार जवळून अनुभवता आला. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट निसर्गाशी नाते जोडणे आणि दैनंदिन कामातून थोडा विरंगुळा मिळवणे असा होता.

आज सकाळी ६ वाजता मोझरी गावातून पदभ्रमंतीला सुरुवात करण्यात आली. सहभागी पदभ्रमंती करून सकाळी ९ वाजता किल्ल्यावर पोहोचले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी गाविलगड किल्ल्याचा इतिहास, भौगोलिक रचना व संवर्धनाबाबत सविस्तर माहिती घेतली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह अचलपूरचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरकराव, उपवनसंरक्षक अग्रिम सैनी, चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोराणकर, अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन सहारे, जिल्हा प्रशासन अधिकारी विकास खंडारे, चिखलदराचे नायब तहसीलदार सुधीर धावडे, प्रवीण काळे व तुषार बुरघाटे, चिखलदरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरज गोहाळ, सहायक वनसंरक्षक अक्षय तळपे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. युवनाते, वनपाल विनोद कासदेकर, वनरक्षक मयूर सानप, श्री. मलवार, श्री. बोरकर, मनीष ढाकुलकर उपस्थित यांनी मोहिमेत सहभाग नोंदविला. या मोहिमेचे नियोजन विभागीय वन अधिकारी अनंत डिगोळे यांनी केले. मेळघाटच्या कुशीत हरवायला, निसर्गाशी नाते जुळवायला आणि आठवणींचा ठेवा जमवायला हा एक सुवर्णक्षण असल्याची भावना सहभागींनी नोंदविली.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा एमएसएमई क्रेडिट आऊटरिच कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**अमरावती:** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अमरावती क्षेत्रीय कार्यालयातर्फे एमएसएमई क्रेडिट आऊटरिच कार्यक्रम पार पडला.

एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे उप महाप्रबंधक हेमंत शर्मा, अभिनंदन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून सीए आणि एमएसएमई सबसिडी विशेषज्ञ पंकज अग्रवाल उपस्थित होते. यावेळी एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी नेत्रदीप चौधरी, सुरेश जैन इंडस्ट्रीजचे संचालक सुरेश जैन, आरोग्यम् हॉस्पिटलचे संचालक किरण हातगावकर उपस्थित होते.

हेमंत शर्मा यांनी सेंट्रल बँक ग्राहकासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले. शिवाजी देठे यांनी बँक एमएसएमई क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहे असे सांगितले. किरण पातूरकर यांनी अमरावती वेगाने प्रगती करत असलेले शहर असून भविष्यात अमरावतीमध्ये येणारे विविध उद्योगाबद्दल माहिती दिली. बँक आपल्या दारी आली असून सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. पंकज अग्रवाल यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध व्यवसाय योजना आणि त्या मध्ये मिळणारे अनुदान याबाबत चर्चा करून प्रश्नाची उत्तरे दिली.

यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि एमआयडीसी असोसिएशन अमरावती यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या कॅम्पमध्ये बँकेतर्फे २७ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पांडेय यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या सुविधा, तसेच सायबर गुन्ह्यापासून वाचण्यासाठी घेण्यात येणाऱ्या सावधानीबाबत मार्गदर्शन केले. निलेश मुंदेकर यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी आभार मानले.

# संतांचे विचार समाजाला दिशा व मार्गदर्शन देणारे - आ.रवि राणा

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

◆ श्री. संत गजानन महाराज मुर्तीची प्राणप्रतिष्ठा, होम हवन व कलश स्थापना



**अमरावती :** श्री. संत गजानन महाराज यांच्या प्रगटदिनाच्या पावन महापर्वानिमित्त दाढी येथे आयोजित श्री. संत गजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, होम-हवन व कलश स्थापनेचा कार्यक्रम अत्यंत भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी आमदार श्री. रवि राणा यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस वैदिक मंत्रोच्चारात श्री. संत गजानन महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर होम-हवन व कलश स्थापनेचे विधी पार पडले. परिसर 'गण गण गणात बोते' च्या जयघोषाने दुमदुमून गेला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व प्रसादाचा लाभ घेतला. या प्रसंगी उपस्थित ग्रामस्थ, भक्तगण व मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना आ. रवि राणा यांनी सांगितले संतांचे विचार समाजाला योग्य मार्गदर्शन करणारे असून भक्ती, श्रद्धा व सेवाभाव यांचा संदेश देणारे आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी आ. रवि राणा यांनी श्री. संत गजानन महाराज मंदिराच्या उभारणीकरिता ३० लक्ष रुपयांच्या निधीमधून सभामंडप बांधून देण्याची घोषणा केली. या घोषणेमुळे उपस्थित भाविक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मंदिर परिसरात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हा सभामंडप उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट

खामगाव

# २५ फेब्रुवारीला शेगाव येथे राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा

◆ महामहिम राष्ट्रपती द्रोपदी जी मुर्मू यांच्या हस्ते होणार आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन..! ◆ केंद्रिय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली माहिती

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**खामगाव :** भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने येत्या २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान शेगांव येथे ठराष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा २०२६ठ चे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते होणार आहे .अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली.

आरोग्य मेळावा संत गजानन महाराजांच्या नगरीमध्ये होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन कार्यक्रमाला महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंदआबा पाटील, सह पालकमंत्री संजय सावकारे, राज्याचे कामगारमंत्री आकाश फुंडकर, आ.डॉ.संजय कुटे, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष पद्मश्री पद्मविभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा तसेच आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य प्रोफेसर राकेश शर्मा यांना देखील निमंत्रित करण्यात आले आहे.

आयुष मंत्रालयाच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी अखिल भारतीय आयुर्वेद महासंम्मेलनाला देण्यात आली आहे. अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ही महाराष्ट्र त्र्यंबकेश्वर येथे १९०७ साली स्थापन झालेली आयुर्वेदाची सर्वात मोठी व जुनी संघटना आहे जी संपूर्ण देशभर कार्यरत आहे. सदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आयोजन समिती स्थापन करण्यात आली असून आयुर्वेद महासंमेलनाचे उपाध्यक्ष डॉ.आशुतोष गुप्ता यांना आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आलेली आहे. आयुर्वेद महासंम्मेलनाने यापूर्वी २२ राज्यस्तरीय आरोग्य तसेच ३ राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य मेळावे त्यांनी यशस्वीपणे आयोजित केले आहेत.

या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये आयुष चिकित्सा पद्धतींचा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, सिद्धा, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी, निसर्गोपचार व योगाचा प्रचार प्रसार व्हावा या दृष्टीकोनातुन केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

२५ ते २८-फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्यात चारही दिवस नागरिकांची व रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन देखील विविध तज्ञ व्याख्यानांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. या मेळाव्याचा फायदा बुलढाणा जिल्हा व परिसरातील शेतकऱ्यांना देखील होणार असून या मेळाव्यात वन औषधी लागवड, संदर्भात मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे. त्याचा उपयोग शेतकऱ्यांना आपल्या शेतात वन औषधी लागवडीसाठी होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

या आरोग्य मेळाव्यात देशभरातील अनेक आयुष औषध निर्माता कंपनी सहभागी होणार असून त्यांच्या माध्यमातून गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेसचा अवलंब ते कशा पद्धतीने करीत आहेत, सोबतच आयुर्वेदामध्ये चाललेले नवीन नवीन संशोधन याबद्दलची माहिती देखील दिली जाणार आहे. आयुष औषधी निर्माता वर्गासाठी देखील वेगवेगळ्या कार्यशाळांचे आयोजन या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या ठिकाणी वनऔषधी प्रदर्शनाच्या माध्यमातून सामान्य लोकांना आपल्या जवळपास सापडणाऱ्या वन औषधीच्या साहाय्याने सोपा आणि माफक दरात उपचार कशा पद्धतीने केले जाऊ शकतता याची देखील माहिती या ठिकाणी मेळाव्यात दिली जाणार आहे.

आपण आयुष मंत्री म्हणुन कार्यभार स्वीकारल्यानंतर अभिनव पद्धतीने आयुष मंत्रालयाचे कामकाज पुढे नेण्याचा सातत्याने काम करत आहोत. यातील प्रमुख बाबी म्हणजे, देश का प्रकृति परीक्षण अभियान, २९ ऑक्टोबर २०२४ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची घोषणा केली. या अभियानात १.३९ कोटी लोकांनी सहभाग घेतला आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये ५ गिनीज विश्वविक्रम नोंदवले गेले.

त्याचप्रमाणे जागतिक आरोग्य संघटनेसोबत (ेंध्) मिळून पारंपारिक औषधोपचारांवरील दुसरी जागतिक शिखर परिषद डिसेंबर २०२५ मध्ये दिल्लीत संपन्न झाली. यामध्ये १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते, २५ हून अधिक देशांचे मंत्रीस्तरीय शिष्टमंडळ आले होते आणि १८ देशांसोबत द्विपक्षीय बैठका (ग्रेैंत् शाृग्हे) पार पडल्या. जून २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ५ गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवले गेले. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे ३ लाखांहून अधिक लोकांनी एकत्र योगाभ्यास केला. ऑक्टोबर २०२४ मध्ये, आदरणीय राष्ट्रपतींच्या हस्ते ेंर्छे, दिल्ली येथे 'आयुष औषधी केंद्राचे' उद्घाटन करण्यात आले.

आता आयुष मंत्रालयाच्या सर्व संस्थांमध्ये आम्ही आयुष औषधी केंद्रे सुरू करणार आहोत ही आयुष औषधी सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याची आमची योजना आहे. सध्या आयुष्मान भारत योजनेत आयुष पॅकेजेसचा समावेश करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. आपल्या मंत्रीपदाचा फायदा सर्वसामान्य जनतेलाही व्हावा. या दृष्टीकोनातुन आयुष आरोग्य मेळावा आपल्या जिल्हयात अखिल भारतील आयुर्वेद महासंम्मेलनाच्या माध्यमातुन घेत आहोत. या मेळाव्याचा लाभ नागरीकांनी घ्यावा असे आवाहन केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

**पाहणी दौरा..!**

शेगाव येथे राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे या मेळाव्याचे उद्घाटन महामहीम राष्ट्रपती श्रीमती दौपद्री मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमासाठी स्थळ निश्चिती करण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वतः शेगाव शहरातील संत गजानन महाराज इंजिनिअरिंग कॉलेज ,देशमुख फार्म आणि विसावा परिसरातील जागेची पाहणी केली यावेळी त्यांच्यासोबत राज्याचे कामगारमंत्री श्री.आकाशजी फुंडकर जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रत्येक स्थळाची पाहणी करून जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चाही केली.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## ओमप्रकाश बाजोरिया यांचे मरणोत्तर नेत्रदान

**अकोला :** रोटरी नेत्रदान केंद्राच्या वतीने मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले.स्थानीय जठारपेठ येथील रहिवासी ओमप्रकाश नारायणदास बाजोरिया यांचे दि २ फेब्रुवारी रोजी निधन झाले.ते ७१ वर्षाचे होते.त्यांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्यांचा हा संकल्प अँड सत्यनारायण जोशी नवल अग्रवाल यांनी पूर्ण केला.त्यांनी मृतकाचे नेत्र गोलक संकलित करण्यासाठी रोटरी नेत्रदान केंद्राचे प्रमुख डॉ जुगल चिरानिया यांना निमंत्रित केले.नेत्रतज्ञ डॉ चिराणीया यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक रोहित भिमटे यांच्या मदतीने मृतक ओमप्रकाश बाजोरिया यांचे नेत्रगोलक संकलित करून ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अंधत्व निवारणसाठी पाठविण्या त आले. या नेत्र गोलक संकलन समयी मृतक बाजोरिया यांचे कुटुंबीय व बहुसंख्य नातेवाईक उपस्थित होते.

## रोटरी ईस्टने बहाल केलीत जिल्हा महिला रुग्णालयात खेळणी



**अकोला :** सामाजिक व मानवीय सेवेत सक्रिय रोटरी क्लब ऑफ अकोला ईस्टच्या वतीने जिल्हा महिला रुग्णालयातील कुपोषित मुलांच्या वॉर्डसाठी खेळणी, मेजरमेंट कप भेट देत कॅन्सर डेचे आयोजन केले. सिव्हिल सर्जन डॉ. आरती कूलवाल यांच्या उपस्थितीत कुपोषित मुलांच्या मनोरंजनासाठी व त्यांची सक्रियता टिकवून ठेवण्यासाठी रोटरी क्लब ईस्टने शासकीय महिला रुग्णालयाच्या एनआरसी वॉर्डमध्ये सुमारे १२५ खेळणी भेट दिली. या खेळण्यांचे उद्घाटन डॉ. आरती कूलवाल यांनी केले. या प्रकल्पांतर्गत डॉ. आरती कूलवाल यांनी कुपोषित मुलांच्या आहारासाठी वापरल्या जाणाऱ्या काचेच्या मेजरमेंट कपची रोटरी ईस्टने पूर्तता केली.या कार्यक्रमात सिव्हिल सर्जन डॉ. आरती कूलवाल, वंदना पाटेकर, डॉ. वानखेडे, डॉ. नारायण साधवानी, मॅट्रॉन जलील खान, क्लब अध्यक्ष सुनील साधवानी, कदम सिस्टर आदी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय मुकबधीर दिव्यांग बुद्धीबळ स्पर्धेत अकोल्याचा डंका

**अकोला:** महाराष्ट्र स्पोर्ट्स काऊन्सिल ऑफ द डिफ असो.व्दारा नाशिक येथे आयोजित राज्यस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत अकोल्याच्या मूकबधिर दिव्यांग खेळाडूंनी आपला दबदबा निर्माण केला.या स्पर्धेत अकोल्या च्या संघाचा खेळाडू सलमान मोहम्मद याने प्रथम क्रमांक व सोहेल शहा याने तृतीय क्रमांक पटकावला.त्यांना असो चे प्रशिक्षक अश्विन कट्टा यांचे मार्गदर्शन लाभले.स्पर्धेचा पुरस्कार सोहळा महाराष्ट्र स्पोर्ट्स काऊन्सिलचे अध्यक्ष राजेश नायर, सचिव गोपाल बिबरे, चेतन जोशी, दुभाषीक वरद कुळकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा गौरव

**अकोला :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी करणा-या विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांचा सन्मान सोहळा महाविद्यालयात पार पडला. या कार्यक्रमात शैक्षणिक, संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, एनसीसी, एनएसएस तसेच प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या व्यक्तींना गौरविण्यात आले.

# श्रींच्या प्रकट दिनानिमित्त क्रांती मल्टीपर्पज फाउंडेशनतर्फे नाश्ता व पाणी वाटप

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी




**अकोला :** श्रींच्या प्रकट दिनाच्या पावन निमित्ताने क्रांती मल्टीपर्पज फाउंडेशन, अकोला यांच्या वतीने हजारो भावीक भक्त यांना नाश्ता व पाणी वाटपाचा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. सोबतच झेंडू बाम याचे सुद्धा वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत भाविकांसह गरजू नागरिकांना नाश्ता व शुद्ध पिण्याचे पाणी वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमामुळे सकाळपासून दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांद्वारे सेवा करणे हाच संस्थेचा उद्देश असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. लाखो भावीक भक्त पायदळ शेगाव येथे जातात आपात्कालीन परिस्थितीसाठी संस्थेकडून २ दिवस मोफत रुग्णवाहिका सुद्धा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी अक्षय नागापुरे, दामिनी नागापुरे, निरज रहाटे, जगदीश पडिगेल, मयूर सुरोसे, शुभम डहाके,आशिष सोनोने, अभिलाष तायडे, गजानन नावकार, किरण वलीवकर, अखिलेश तिवारी, गौरव प्रानजाळे, रोहित वाघ, अविनाश बागडे, हरीश वलीवकर, मयूर कावळे, विलास नागापुरे, सौं सपना झाडे, श्रेया नागापुरे, किशोर बंड, सविता नागापुरे, प्रवीण झाडे, मंगेश घोडे, अरुण मेहरे

व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. क्रांती मल्टीपर्पज फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व भाविक व नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

## मनपा शाळेत बसविले पाणी शुद्ध उपकरण

**अकोला:** सामजिक सेवा कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला कवीनच्या वतीने कृषी नगर परिसरातील क्लबची दत्तक मनपा मराठी शाळा क्र १६ मध्ये विद्यार्थ्यांच्या सोईकरिता पाण्याचा टाकी, वॉटर प्युरिफायर आणि तीन वॉशबेसिन बसवण्यात आलेत. विद्यार्थ्यां ची दैनिक गरज लक्षात घेता क्लब ने पुढाकार घेत हा रचनात्मक व सेवाभावी उपक्रम साकार करीत शाळेत पाण्याची टाकी, वॉटर प्युरिफायर आणि तीन वॉशबेसिन स्थापित केल्यात. मुख्याध्यापिका मीना देशमुख व क्लब पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

## सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**अकोला:** सावित्रीबाई फुले विकास मंडळ कडून सावित्रीबाई जयंती जाजू नगर रोड परिसरात १९५ वी जयंती साजरी करण्यात आली. उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष प्रतिभाताई अवचार व राष्ट्रवादीच्या महिला जिल्हा सचिव व संस्था अध्यक्ष रंजनाताई शिरसाठ, उपाध्यक्ष रूपाताई वानखडे, सचिव विजय भोजने, कोषाध्यक्ष अंजूताई तेलगोटे, सहसचिव शितलताई जंजाळ, सदस्य वनिताताई हिवराळे, लक्ष्मीबाई गजभार, माजी सैनिक राजेंद्र तेलगोटे, रमेश गजभार, सत्यशीला गवई, जया वानखडे, स्वातीताई दामोदर, कांबळे ताई, वंदनाताई शिरसाठ, रिटायर पोस्ट ऑफिस रविंद्र शिरसाठ, उमाळेताई, प्रमोद वानखडे, मनीष तेलगोटे, गौरव शिरसाट उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सैनिक अरविंद जंजाळ तर आभार प्रदर्शन भोजने काका आणि खंडारे मामा यांनी केले.

## अमृतवचन संतांचा अलंकार- हभप भरत महाराज पाटील

**अकोला:** संत हे जगाचे कल्याण करणारे तत्त्व आहे. त्यांची वृत्ती ही सदा कल्याणकारी असते. याच वृत्तीमुळे ते सर्वांचे हितकारक असतात. अगदी हिंसक पशु सुद्धा ते शांत करू शकतात. संतांच्या याच त्यागी,परोपकारी व सदाचारी वृत्तीमुळे त्यांनी ज्ञानेश्वरांच्या रूपात रेड्याच्या मुखातून वेद वदवीला, संत गजानन महाराजांनी हिंस्त्र घोड्याला शांत केले.अशी कितीतरी उदाहरणे संतांच्या संदर्भात देता येतील. म्हणून भक्तांनी संतांचा अनुग्रह प्राप्त करून भगवंताची कृपा आपल्या जीवनात आणण्याचा हितोपदेश हभप भरत महाराज पाटील यांनी दिला.खडकी परिसरातील धाबेकर नगरात संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव निमित्त संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगर व खडकी बु. च्या समस्त नागरिकांच्या वतीने आयोजित कीर्तन उत्सवात कीर्तनाचे चतुर्थ पुष्प हभप भरत महाराज पाटील म्हैसवाडीकर यांनी गुंफले.संत तुकाराम महाराजांच्या गाथेचा परामर्श घेतांना त्यांनी प्रभू कृपेवर कीर्तन सादर केले. ते म्हणाले, संतांवर साक्षात भगवंताची कृपा असते. सामान्य माणसाच्या जीवनात अशी कृपा दानामुळे प्राप्त होते.

## हिवरखेड नगरीत श्रींचा प्रकटदीन उत्साहात

♦ स्वस्तिक कॉलनी, मोठा महादेव संस्थान परिसर, कामठा नगरात, महाप्रसाद वितरीत

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**हिवरखेड :** येथे उत्साहात गजानन महाराजांचा १४८ व्हा प्रगटदीन सोहळा साजरा करण्यात आला, गावात सर्वत्र भक्तीमय वातावरन दिसून आले, तर श्री पांडुरंग संस्थान व गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्री संत गजानन महाराज पालखी दिंडी गावातून काढण्यात आली, यामध्ये भाविक महिला , पुरुष, तरुण, तरुणी यांनी हजेरी लावली, तर गावातील प्रत्येक गल्लीत महिलांनी रागोडी काढून पालखीचे ठीक ठिकाणी स्वागत केले, तर प्रगटदिनी गावातील स्वस्तिक कॉलनीतील गजानन महाराज संस्थानच्या वतीने भागवत सप्ताह समाप्ती करून महाप्रसाद वितरीत केला, या स्थळी हजारो भाविकांनी गजानन महाराज दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला, तसेच गावातील प्रभाग ५ मधील मोठा महादेव मंदिराच्या मागील बाजूला असलेले संत गजानन महाराज मंदिर येथे सुद्धा महाप्रसाद वितरीत करण्यात आला, येथील भाविकांनी परिश्रम केले, आणि संध्याकाळी कामठा नगरातील गजानन महाराज मंदिर येथे बेसन भाकरचे आयोजन करण्यात आले, या संस्थांनचे काम सुद्धा प्रगती पथावर सुरू, दिवसभर गावात भाविकांची रेलचेल दिसून आली, काही भाविकांनी गजानन महाराज शेगांव पायी जाणाऱ्या भाविकांसाठी सेवा प्रदान केली, संत गजानन महाराजांचा भाविकांना चागलाच अनुभव दर्शुण येतो भाविकांची महाराजांन प्रति चांगलीच श्रध्दा वाढत आहे, असा अनुभव भाविक उत्साहाने सांगतात.

## आदर्श कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंटचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी




**अकोला:** आदर्श कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंटचे राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर दत्तक गाव कापशी येथे आयोजित करण्यात आले होते.

शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रक्षा विवेक डवरे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून कापशीच्या सरपंच वेणूताई उमाळे व आदर्श कॉन्व्हेन्टचे मुख्याध्यापक नानाभाऊ किरतकर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी रोशन कोरडे व सुप्रिया पडगिलवार व महाविद्यालयातील शिक्षक, रा.स.यो. विद्यार्थी उपस्थित होते.

सात दिवसांच्या या श्रमसंस्कार शिबिरामध्ये 'हर घर संविधान' अंतर्गत संविधानाचे वाटप करण्यात आले. प्रभात फेरी, पथनाट्य 'माझी कचरा, माझी जबाबदारी' 'ग्राहक शिक्षण 'व 'बालविवाह मुक्त भारत' पाणलोट व्यवस्थापन विकास व पडीत जमीन विकास अशा विविध विषयांवर व त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'लेक वाचवा लेक शिकवा' या विषयावर पथनाट्य सादर करून समाज प्रबोधनावर भर देण्यात आला. रक्तदान शिबिरही घेण्यात आले. प्रा. राहुल माहुरे यांनी' ग्राहक शिक्षण' या विषयावर आणि प्रा. मोना उमाळे यांनी ताण तणाव व्यवस्थापन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच, रुपेश रंगे यांनी 'पडित जमीन विकास' या विषयावर तर नानाभाऊ किरतकर यांनी 'माझा कचरा, माझी जवाबदारी 'या विषयावर उपक्रमा अंतर्गत जाणीव जागृती व मार्गदर्शन केले. महिला व बालविकास अधिकारी पदमाकर सदाशिव यांनी 'बालविवाह मुक्त भारत' या विषयावर मार्गदर्शन केले.

समारोपाला अध्यक्ष म्हणून आदर्श ज्ञानदान बहुउद्देशीय मंडळ संस्थेचे अध्यक्ष प्रा. विवेक डवरे सर व प्रमुख पाहुणे उपसरपंच तथा उपाध्यक्ष आदर्श ज्ञानदान बहुउद्देशीय मंडळ अंबादास उमाळे, तसेच डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. रोनिल आहाळे, माजी रा.से.यो कार्यक्रम अधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला.

शासनाकडून सत्र २०२५-२६ च्या विशेष शिबिराला ठशाश्वत विकासासाठी युवा: पाणलोट व्यवस्थापन व पडीत न विकास ही थीम विविध उपक्रम राबविले गेले. त्या अनुषंगाने शिबिरामध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबवले.

## सैयद मोहसिन उर्दू हायस्कुल अँन्ड जूनियर कॉलेज शिवनी येथे विद्यार्थ्यांना निरोप

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी




**अकोला:** सैयद मोहीन उर्दु हायस्कुल अँन्ड जूनियर कॉलेज शिवणी येथे १२ वी चे विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल होते तर नगर सेवक शेख शमसुल कमर शेख साबीर व अलहाज मोबीन शहजाद शेख मुसा होते. प्रास्ताविक सहायक शिक्षक असीमोद्दीन यांनी केले. कॉपीमुक्त अभियान व पुढील शिक्षण विषयी मार्गदशन केले. शाळेतील दानीया निसबत अजलफा अनम तनजीला सदफ माहीम सबा तहरीन निसा जोहरा बी नमीरा तसनीम तस्नीम मुलांनी त्यांचे विचार मांडले.

आणि भूतकाळातील आठवन आणि काही कविता विश्लेषण करून मांडले व तसेच शेख शमसुल कमर यानी आपल्या भाषणातून मुलांना मार्गदर्शन केले पुढील भविष्य करीता शूभेच्छा दिले अल्हाज मुबीन शहजाद सर यांनी समकालीन धार्मिक शिक्षणाच्या बाबतीत मार्गदर्शन केले आहे. व तसेच शाळेतील सहायक शिक्षक असीमोद्दीन यानी आभारपर्दशन केले कार्यक्रमाला यशस्वी करण्या साठी शाळेती सहायक शिक्षक शमशेर खान मो जाहीद आकीबुल्ला खान मो अनवारोद्दीन खान अजमतुलला काजी मोइनोदीन मो फारुख अबदुल शकुर सैयद वसीम यानी परीश्रम घेतले.

## यंदा जिल्हा ग्रंथोत्सव अकोटमध्ये होणार सोमवारी शुभारंभ

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी




**अकोला:** यंदा जिल्हा ग्रंथोत्सव अकोट येथील सांस्कृतिक कलाभवनात दि. ९ व १० फेब्रुवारी रोजी होणार आहे. ग्रंथोत्सवात कथाकथन, परिसंवाद, कवीसंमेलन, ग्रंथप्रदर्शन अशा कार्यक्रमांची रेलचेल असेल.

शुभारंभानिमित्त सोमवार, दि. ९ फेब्रुवारीला स. १० वा. ग्रंथपूजन व ग्रंथदिंडी होणार आहे. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते स. ११ वा. होईल. ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार प्रतिमा इंगोले अध्यक्षस्थानी असतील. उद्घाटन सत्राला विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या दिवशी दु. २ वा. 'मला जिजाऊ व्हायचं' हा एकपात्री प्रयोग सादर होणार असून, त्यानंतर 'मराठी भाषेपुढील आव्हाने' या विषयावरील परिसंवाद साहित्यिक पुष्पराज गावंडे यांच्या अध्यक्षतेत होईल. दु. ४ वा. भाषावैज्ञानिक व व-हाडी बोलीचे अभ्यासक रावसाहेब काळे यांच्या अध्यक्षतेत 'सोशल मीडिया आणि वाचन' या विषयावर परिसंवाद होईल.

मंगळवार, दि. १० फेब्रुवारीला स. १०.३० वा. देशभक्तीपर गीतसंगीत कार्यक्रम, स. ११ वा. 'आजचा वाचक, उद्याचा विचारवंत' या विषयावरील परिसंवाद, दु. १२ वा. 'वाचन संस्कृतीमध्ये ग्रंथालयांचे योगदान व भूमिका' या विषयावरील चर्चासत्र होईल. दु. २ वा. 'आजच्या विद्यार्थ्यांपुढील आव्हाने' या विषयावर परिसंवाद होईल. दु. ३ वा. कवी डॉ. विठ्ठल कुलट यांच्या अध्यक्षतेत कवीसंमेलन होणार असून, प्रसिद्ध गझलकार गोपाळ मापारी निवेदन करणार आहेत. दु. ४.३० वा. समारोपाचे सत्र होईल.

जिल्ह्यातील वाचक, रसिक, कवीलेखक, ग्रंथप्रेमी नागरिकांनी ग्रंथोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. अतुल वानखडे यांनी केले आहे.

## अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे अजित दादांना श्रद्धांजली



प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**अकोला:** उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखेचे वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष कृष्णा अंधारे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या शोकसभेत महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार ,लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख, प्रा. प्रकाश डवले,प्रदीप खाडे, पंजाबराव वर, डॉ. श्रीकांत काळे, महिला विभागीय अध्यक्ष कल्पनाताई बिडवे, बुढण गाडेकर, अजय मते, मधुकरराव देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अजित दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. अजित दादांची काम करण्याची शैली ,धडाडी तसेच सामाजिक,राजकीय इतर क्षेत्रात त्यांचं योगदान या संदर्भात मान्यवरांनी आपलं मनोगत व्यक्त केले. यावेळी योगेश थोरात ,माधुरी वाघमारे,संजय सूर्यवंशी श्रीकांत सरोदे अरुण खोटरे ,विठ्ठलराव वाघ काशिनाथ पटेकर,प्रदीप लुगडे, विक्रम वाघमारे, उज्वला बावस्कर ,छाया पवार ,सीमा लोणकर ,सविता राऊत, नरेश सूर्यवंशी ,दीपक नाकट,राजू पाटील वाहिले ,डॉ.प्रकाश गोंड ,रामा पाटील, साखरकर गुरुजी ,दीपक गावंडे ,शुभम झांबरे आदी उपस्थित होते.

## सोशल मीडियावर महिलांचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल प्रकरणी पुण्यातील तरूणाविरूद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** सोशल माध्यमावर फेक अकाउंट तयार करून महिलांचे अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी पुण्यातील एका तरुणाविरुद्ध मुर्तिजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी आकाश लक्ष्मण कांबळे (वय ३५, रा. पिंपरी चिंचवड, पुणे) याने फिर्यादीच्या मैत्रिणीच्या नावाने बनावट अकाउंट तयार केले. त्या अकाउंटवरून फिर्यादी, तसेच तिच्या मैत्रिणीचे अश्लील मजकूर असलेले फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले. हा प्रकार १५ जानेवारी रोजी ते ४ फेब्रुवारी रोजी घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीने आरोपीस फोन करून याबाबत जाब विचारला असता, आरोपीने उलट आणखी अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील विविध कलम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास मूर्तिजापूर पोलिस करीत असून, आरोपीचा शोध घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक अजित जाधव यांनी दिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

## यवतमाळ नगर परिषदेत ९ फेब्रुवारीला सर्वसाधारण सभा

# 45 विषयांवर होणार चर्चा

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

राहुल वासनिक

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदेची सर्वसाधारण सभा सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नगर भवन येथील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सभेत शहराच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित एकूण ४५ विषयांवर चर्चा करून निर्णय घेतले जाणार आहेत. नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, विषय समिती सभापती व नगरसेवकांच्या अभिनंदनापासून ते पायाभूत सुविधा, आर्थिक धोरणे, सामाजिक योजना आणि शहर सुशोभीकरणाशी संबंधित प्रस्तावांचा यात समावेश आहे.

सभेच्या प्रारंभी २०२५ मधील सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात येणार आहे. त्यानंतर नगराध्यक्षांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यातील कामांच्या अंमलबजावणीचा आढावा सभेपुढे सादर केला जाणार आहे.

शहराच्या आर्थिक कारभाराशी निगडित मालमत्ता कर विभागांतर्गत मालमत्ता हस्तांतरण शुल्क, दैनंदिन बाजार फी वसुलीचे धोरण, नाहरकत प्रमाणपत्रासाठी सेवा शुल्क निश्चित करणे यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा अपेक्षित आहे. थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीसाठी प्रस्तावित अभय योजनेलाही सभेत मंजुरी दिली जाण्याची शक्यता आहे. पायाभूत सुविधांच्या दृष्टीने ही सभा महत्त्वाची ठरणार आहे. झोननिहाय रस्त्यांची दुरुस्ती, पॅचेस कामे व खडीकरण, पाणीपुरवठा विभागातील हातपंप व मोटार पंप दुरुस्तीची वार्षिक निविदा, पाइपलाइन लिकेज दुरुस्ती, यावर निर्णय अपेक्षित आहे. तसेच जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या भूमिगत गटार योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात सांडपाणी प्रक्रिया केंद्रांसाठी भूसंपादनाचा विषय चर्चेला येणार आहे. ऊर्जा बचत व पर्यावरणपूरक उपाययोजनांवरही सभेचे लक्ष केंद्रित राहणार आहे. एलईडी पथदिव्यांची देखभाल-दुरुस्ती, नवीन एलईडी दिवे व CCMS प्रणालीसाठी करार, तसेच नगर परिषद शाळा, प्रशासकीय इमारती आणि मोकळ्या जागांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावांवर विचारविनिमय होणार आहे. विविध प्रभागांमध्ये सोलर हायमास्ट दिवे उभारण्यासही प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्याचा प्रस्ताव आहे.

एकूणच, ९ फेब्रुवारीला होणारी ही सर्वसाधारण सभा यवतमाळ शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार असून, या बैठकीतील निर्णयांचा थेट परिणाम आगामी काळातील शहराच्या कारभारावर आणि विकासकामांवर होणार आहे.



### महापुरुषांच्या पुतळ्यांचे रंगकाम व सौंदर्यीकरणाचे प्रस्ताव

- सामाजिक व सांस्कृतिक विषयांमध्ये महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, दिनदयाल उपाध्याय, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित पुतळे, चौक व रस्त्यांचे नामकरण, तसेच राष्ट्रसंत थोर महापुरुषांच्या पुतळ्यांचे रंगकाम व सौंदर्यीकरणाचे प्रस्ताव सभेपुढे मांडले जाणार आहेत. स्वातंत्र्य संग्राम सैनिक वस्तुसंग्रहालयाला स्व. पृथ्वीगौर हरिगिर गोसावी यांचे नाव देण्याचा प्रस्तावही चर्चेत आहे.

### बाह्य यंत्रणा नियुक्त करणार

- प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार समिती नेमणे, लाभार्थी नेतृत्वाखालील बांधकाम योजनेत निकष पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांना यादीतून वगळणे, तसेच अतिक्रमित भागातील लाभार्थ्यांना पट्टे वाटपासाठी बाह्य यंत्रणा नियुक्त करण्याचा विषयही महत्त्वाचा आहे.

### शाळा बीओटी तत्वावर देणार

- शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन अग्निशमन वाहन व अत्याधुनिक साहित्य खरेदी, सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, भटक्या श्वानांसाठी निवारा केंद्र उभारणी, यासंबंधी प्रस्तावांवर निर्णय अपेक्षित आहे. याशिवाय बंद पडलेल्या नगर परिषद शाळा बीओटी तत्वावर खासगी संस्थांना देण्याचा प्रस्तावही सभेत मांडण्यात येणार आहे.

# आर्णी शहर कचऱ्याच्या विळख्यात; स्वच्छता अभियानातून इशारा

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**आर्णी युथ डेव्हलपमेंट फाउंडेशनचा आक्रमक**

**आर्णी** : आर्णी शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेली अस्वच्छता, रस्त्यांवर साचलेला कचरा आणि ढासळलेली घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था यामुळे नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आर्णी युथ डेव्हलपमेंट फाउंडेशन, गुड मॉर्निंग ग्रुप आणि पत्रकार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने शहरात स्वच्छता व कचरा संकलनाचा आक्रमक उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून प्रशासनाच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधत ठोस उपाययोजनांची मागणी करण्यात आली.

या उपक्रमात शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांच्या कडेला, नाल्यांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा संकलित करण्यात आला. केवळ साफसफाईपुरते मर्यादित न राहता, प्रशासनाला आरसा दाखविण्याचा आणि नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा स्पष्ट संदेश यावेळी देण्यात आला. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड सहन केली जाणार नाही, असा ठाम इशाराही देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान अरहम कोठारी व मीनल काटपिल्लेवार यांनी घनकचरा संकलन, वर्गीकरण आणि शास्त्रीय पद्धतीने कचरा व्यवस्थापन कसे करता येईल, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. कचरा व्यवस्थापन ही केवळ नगरपालिका किंवा सफाई कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, प्रशासनाने ठोस व दीर्घकालीन धोरण आखल्याशिवाय परिस्थितीत सुधारणा होणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष गोपाल भाऊ कोठारी यांनी नगर परिषदेच्या ढिसाळ कारभारावर तीव्र शब्दांत टीका केली. "फक्त स्वच्छतेचे फलक लावून प्रश्न सुटणार नाहीत. कचरा संकलन, प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी स्वतंत्र यंत्रणा, आधुनिक साधने आणि नियमित देखरेख आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात अधिक आक्रमक आंदोलन छेडले जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

या उपक्रमाला नगरसेवक अमोल मांगूळकर, नगरसेवक सैय्यद रियाज, गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी बांधव तसेच नगर परिषदेचे सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी "स्वच्छ आर्णी – निरोगी आर्णी"चा संकल्प केला. कार्यक्रमाच्या शेवटी अतुल भाऊ देशमुख यांनी आभार मानले.

हा उपक्रम म्हणजे केवळ स्वच्छता नव्हे, तर आर्णी शहराच्या भविष्यासाठी दिलेला गंभीर इशाराच असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# तालुका कामगार केंद्राच्या कारभार; अर्जदारांना अपमानास्पद वागणूक

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**झरी जामणी** : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या झरी जामणी तालुका कामगार केंद्रातील कारभाराबाबत गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. केंद्रातील कामगार विभागात कार्यरत लक्ष्मण डोमे (VERIFY) व किरण जाधव यांच्यावर अर्जदारांशी अपमानास्पद वागणूक देणे तसेच अर्जांची योग्य शहानिशा न करता मनमानी निर्णय घेण्याचे आरोप करण्यात येत आहेत.

**एजंटमार्फत अर्ज मंजूर होत असल्याचा आरोप**

अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, काही ठरावीक एजंटमार्फत आलेले अर्ज 'योग्य' ठरवून मंजूर केले जातात, तर थेट अर्ज सादर करणाऱ्या कामगारांचे अर्ज मुद्दाम 'अयोग्य' ठरवून नाकारले जात आहेत. याबाबत विचारणा केल्यास अर्जदारांना उद्धट व रागीट भाषेत उत्तर दिले जात असल्याचेही सांगण्यात येते.

एका अर्जदाराने सांगितले की, ग्रामसेवकांशी थेट चर्चा करून कागदपत्रांची पूर्तता करण्याची तयारी असूनही, त्यांचे म्हणणे ऐकून न घेता अर्ज थेट रद्द करण्यात आला. "तुला जे करायचे आहे ते कर," अशा शब्दांत अपमान केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

केंद्रात VERIFY पदावर चार कर्मचारी कार्यरत असतानाही, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा न करता फोनवरच निर्णय घेतले जात असल्याचा दावा आहे. आधार कार्ड व ९० दिवसांचे प्रमाणपत्र योग्य असतानाही अर्ज नाकारले जात असल्याने कामगारांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# पत्रकार कृष्णा पाटील चौतमाल यांचा मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**उमरखेड** : हदगाव तालुक्यातील कोळी येथील पत्रकार कृष्णा पाटील चौतमाल यांनी मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प करून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. जीवशास्त्र विषयातील अवयवदान या घटकातून प्रेरणा घेऊन त्यांनी



भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाच्या नोंदणीकृत अवयवदान संकेतस्थळावर आपला संकल्प नोंदविला आहे. याबाबत नुकतेच त्यांना आरोग्य मंत्रालयाकडून अधिकृत प्रमाणपत्र प्राप्त झाले.

मरणोत्तर अवयवदानामुळे एका व्यक्तीच्या मृत्यूनंतर किमान सहा रुग्णांना नवजीवन मिळू शकते. मात्र, माहितीच्या अभावामुळे अद्याप समाजात अवयवदानाबाबत अपेक्षित जागरूकता दिसून येत नाही. अशा परिस्थितीत पत्रकार चौतमाल यांनी घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद ठरत असून परिसरात त्यांच्या कार्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.

आपल्या भावना व्यक्त करताना चौतमाल म्हणाले, "माझ्या मृत्यूनंतरही माझ्या अवयवांचा उपयोग कुणाचे तरी प्राण वाचविण्यासाठी होईल, याचा मला अभिमान आहे."

# त्यागाचे मूर्तिमंत रूप म्हणजे रमाई – प्रा.डॉ.अनिल काळबांडे

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**उमरखेड** : हिमालयासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण आयुष्यात रमाई या सावलीसारख्या सोबत राहिल्या. कोणतीही अपेक्षा न ठेवता निरपेक्ष भावनेने, काटकसर करत संसाराचा गाडा ओढणाऱ्या रमाई म्हणजे त्यागाचे मूर्तिमंत रूप असल्याचे प्रतिपादन प्रख्यात आंबेडकरी विचारवंत प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांनी केले. ते तालुक्यातील बेलखेड येथे आयोजित रमाई जयंती सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक नामदेवराव शिंगणकर होते. प्रमुख अतिथी म्हणून विजयानंद शिंगणकर, डी. बी. शिंगणकर, नामदेव काळबांडे व मुकुंदा शिंगणकर उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण केले. रमाई गीताचे सादरीकरण भाग्यश्री शिंगणकर हिने केले.

प्रा. काळबांडे यांनी रमाईचा संघर्षमय जीवनप्रवास उलगडून सांगताना बाबासाहेब परदेशातून भारतात परतण्यासाठी रमाईंनी गोवऱ्या व कोळसे विकून पैसे पाठवल्याचा प्रसंग उदाहरणादाखल सांगितला. रमाईच्या त्यागातूनच बाबासाहेबांचे कर्तृत्व घडल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांनी रमाईचा आदर्श घेऊन त्याग, बचत व काटकसर जोपासावी, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाला राजू शिंगणकर, यादव शिंगणकर, बुद्धसागर शिंगणकर, महेश काळबांडे, अक्षय शिंगणकर, अक्षय अशोक शिंगणकर, धम्मदीप शिंगणकर, बालाजी शिंगणकर, गयाबाई बहादुरे, लक्ष्मीबाई शिंगणकर, गयाबाई शिंगणकर, रंजनाबाई पाईकराव, जिजाबाई शिंगणकर, सुमनबाई काळबांडे, शांताबाई पाईकराव, प्रजावंती पाईकराव, भगवान शिंगणकर यांच्यासह महिला मंडळ, जि. प. शाळा व ज्ञानदीप शाळेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमशाहीर सुभाष शिंगणकर यांनी केले. प्रास्ताविक मुकुंदा शिंगणकर यांनी तर आभार भगवान शिंगणकर यांनी मानले.

# वाघापूर नाक्या पाठोपाठ वैभव नगरातील कुंटणखान्यांवर धाड

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**यवतमाळ** : दोन दिवसापूर्वी शहरातील वाघापूर नाका परिसरात असलेल्या अपार्टमेंटमध्ये कुंटनखान्यावर धाड टाकुन महिलेसह एका पुरुषाला अटक केली होती. त्यानंतर काल शनिवारी लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणा-या वैभव नगर मध्ये सुरु असलेल्या कुंटनखान्यावर पोलिसांनी धाड टाकुन कारवाई केली.

शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि उच्चभ्रू भाग समजल्या जाणाऱ्या वाघापूर नाका ते पिंपळगाव रोडवरील 'समर्पण अपार्टमेंट' मधील फ्लॅट नंबर ०२ मध्ये गेल्या काही दिवसांपासून देहविक्रयाचा व्यवसाय छुप्या पद्धतीने सुरू असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यावरून शहर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने धाड टाकली. या कारवाईत कुंटणखाना चालवणारी मुख्य महिला सूत्रधार आणि तिचा जोडीदार अंकुश रामभाऊ कडू (वय ४०, रा. भेंडाळा, ता. गंगापूर, जि. संभाजीनगर) याला पोलिसांनी पकडले. या ठिकाणाहून पोलिसांनी एका पीडित महिलेची सुटका केली असून, तिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. वाघापूर नाक्यावरील कारवाईची शाई वाळते न वाळते, तोच शनिवारी दुपारी लोहारा पोलीस स्टेशनच्या पथकाने वैभव नगर परिसरात एका घरात सुरु असलेल्या कुंटणखाण्यावर धाड टाकली. या कारवाईत एका महिला आरोपीसह एका पुरुष आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. भरवस्तीत सुरू असलेल्या या व्यवसायामुळे परिसरातील नागरिक कमालीचे त्रस्त होते. या छाप्यातही पोलिसांनी एका पीडित महिलेची सुटका केली आहे. या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात 'पिटा' ॲक्ट अंतर्गत कठोर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण चार आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम कलम ३, ४ आणि ५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

# कचरा संकलन व्यवस्था कोलमडली

## नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे स्वतः ई-रिक्षा घेऊन रस्त्यावर

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**यवतमाळ** : यवतमाळ शहरातील कचरा संकलन व्यवस्थेचा ढिसाळपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. ई-रिक्षा चालक व सफाई कर्मचारी गैरहजर राहिल्याने प्रभाग क्रमांक १० मध्ये अनेक दिवसांपासून कचरा उचलला जात नसल्याचे चित्र दिसून आले. या परिस्थितीची गंभीर दखल घेत नगरपालिकेचे गटनेते व नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी थेट मैदानात उतरून स्वतः ई-रिक्षा चालवत कचरा संकलन केले.

नगरपालिकेवर प्रशासक राज संपून निवडून आलेली सत्ता स्थापन झाल्यानंतरही शहराच्या स्वच्छतेत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. कचरा संकलनाचा ठेका मिळालेल्या ठेकेदारांवर कोणताही प्रभावी अंकुश नसल्याचा आरोप यावेळी नागरिकांकडून करण्यात आला. कर्मचाऱ्यांची नियमित उपस्थिती, वेळापत्रकानुसार कचरा उचल, ई-रिक्षांचे रोजचे फेरे, गणवेश व ओळखपत्रांची अंमलबजावणी तसेच स्वच्छता नियमांचे पालन होत नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

स्वच्छ भारत अभियान, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार घराघरातून दररोज कचरा संकलन करणे, ओला व सुका कचरा वेगळा गोळा करणे आणि नियमभंग करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करणे हे नगरपालिकेचे कर्तव्य आहे. मात्र प्रत्यक्षात या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला.

डॉ. नीरज वाघमारे यांनी यावेळी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या. "नगरपालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी जबाबदारी झटकून चालणार नाही. ठेकेदार, अधिकारी व कामगार यांची संयुक्त जबाबदारी निश्चित करून नियमभंग करणाऱ्यांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे, अन्यथा आंदोलन छेडले जाईल," असा इशाराही त्यांनी दिला.

ही घटना केवळ एका प्रभागापुरती मर्यादित नसून, संपूर्ण यवतमाळ शहरातील स्वच्छता व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

# 'विनोद पुसनाके अमर रहे'च्या घोषणांत CRPF जवानांना निरोप; शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**पांढरकवडा** : केळापूर तालुक्यातील बोथ गावचे सुपुत्र व केंद्रीय राखीव पोलीस दलात (CRPF) कार्यरत असलेले जवान विनोद पुसनाके यांना शनिवारी (ता. ७) हजारो नागरिकांच्या उपस्थितीत अश्रुपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. बोथ रोडलगत असलेल्या शेतात त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर 'विनोद पुसनाके अमर रहे', 'भारत माता की जय'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

मध्यप्रदेशातील निमज येथे तैनात असलेले ४५ वर्षीय जवान विनोद पुसनाके हे ६ फेब्रुवारी रोजी एका अपघातात गंभीर जखमी झाले होते. अपघातात त्यांच्या मेंदूला जबर दुखापत झाल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून त्यांचे पार्थिव नागपूरहून पांढरकवडा येथे आणण्यात आले.शुक्रवारी रात्री नीलकंठ नगरी येथील त्यांच्या निवासस्थानी पार्थिव ठेवण्यात आले असता नागरिकांनी मोठ्या संख्येने अंत्यदर्शन घेतले. शनिवारी सकाळी पार्थिव बोथ येथे आणण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी बंदुकीच्या फैरी झाडून शासकीय मानवंदना देण्यात आली. यावेळी CRPF चे डी.सी. बनवारीलाल मीना, पोलीस निरीक्षक लहू तावरे, एपीआय सागर पेंडारकर, केंद्रीय राखीव पोलीस दल नागपूरचे पोलीस निरीक्षक ईश्वर शेठी, माजी सैनिक संघटना पांढरकवडा तसेच जय जवान माजी सैनिक संघटना, वणी यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. जवान विनोद पुसनाके यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन मुली व दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या सन्मानार्थ बोथ येथील बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती. गावात ठिकठिकाणी तिरंगा ध्वज व श्रद्धांजली बॅनर लावण्यात आल्याने संपूर्ण गाव देशभक्तीच्या वातावरणात न्हाऊन निघाले होते.

# १६ वर्षांनंतर वणीत होणार कुस्तीची दंगल

## माजी आमदार केसरी दंगल कुस्तीला सर्वानुमते मंजुरी

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**वणी** : वणी शहरात फेब्रुवारी ते मार्च या कालावधीत जत्रा मैदानावर श्री रंगनाथ स्वामी यांच्या नावाने तब्बल ३७ दिवसांची यात्रा भरते. या यात्रोत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेल्या पारंपरिक कुस्त्यांपैकी दंगल कुस्तीचे आयोजन मात्र गेल्या १६ वर्षांपासून बंद होते. यंदा ही परंपरा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे कुस्तीप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

दंगल कुस्ती पुन्हा सुरू करण्यासाठी पैलवान पांडुरंग लांजेवार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नांना सर्व स्तरांतून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यासंदर्भात शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) सायंकाळी ५ वाजता श्री रंगनाथ स्वामी मंदिरात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत यावर्षी महिला व पुरुषांची भव्य दंगल कुस्ती आयोजित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार पुरस्कृत 'माजी आमदार केसरी दंगल कुस्ती' भरविण्याचा निर्णय बैठकीत एकमताने घेण्यात आला. दंगल कुस्तीची तारीख व ठिकाण पुढील बैठकीत निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या बैठकीस पांडुरंग लांजेवार, सुरेंद्र ईखारे, प्रमोद निकुरे, फारुख रंगरेज, इरफान शेख, शेख अकील, अशोक निकुरे, मोरेश्वर बरडे, विठ्ठल चौधरी, बंडू निंदेकर, बाबुलाल पोटदुखे, जहिर शेख, दिलीप खाडे, संतोष जोशी, सूर्यकांत मोरे, जॉन पोन्नलवार, अजय बोबडे, विजय थेरे, रमेश शर्मा, प्रा. दिलीप मालेकर, सुरेश रायपुरे, संदीप जयस्वाल यांच्यासह मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमी व मान्यवर उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि.८ फेब्रुवारी२०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## कृषिमंत्र्यांच्या 'पालक' जिल्ह्यात शेतकऱ्यांचा 'छळ', त्यांना कोणाचे 'बळ'...






# 'देवा' अजब तुझा न्याय, न्याय मागणाऱ्यावर अन्याय !

## अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्याला बुटाने मारहाण, आत्महत्या करण्याचा सल्ला, तक्रार कर्त्याला धमक्या





●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. जिल्ह्यात मोठे प्रकल्प नाहीत ज्याचे जीवनमान शेतीवरच अवलंबून आहे. मात्र, शासकीय योजना खऱ्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाहीत. न्याय माघणाऱ्या शेतकऱ्यावरच अधिकाऱ्यांकडून अन्याय होत आहे. मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी येथील शेतकऱ्याला कृषी अधिकाऱ्याने बुटाने मारहाण केली. शेलुखडसे येथील पोकराची तक्रार करणाऱ्या शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी कृषी अधिकाऱ्याने दिली. तर आता वहीवाटीचा रस्ता माघणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदारानी चक्क आत्महत्याकरण्याचा सल्ला दिला. यावरून जिल्ह्यात लोकशाही नसून अधिकारी शाही सुरू आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस साहेब 'देवा' अजब तुझा न्याय, न्याय माघणाऱ्या शेतकऱ्यावरच होतोय अन्याय अशी म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यातच अधिकाऱ्याकडून छळ होत असून त्यांना कोणाचे बळ मिळत आहे अशी चर्चाही होत आहे.

रिसोड तालुक्यातील केनवड येथे वहिवटीच्या रस्त्यासाठी हक्क मागणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदाराकडून आत्महत्या करण्याचा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावरील विविध व्हॉट्सअॅप ग्रुपवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. परिणामी शेतकऱ्यांसोबत नेहमीच उद्धट भाषा वापरणारे नायब तहसीलदार कुळमेठे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. या गंभीर बाबीकडे तहसीलदा प्रतीक्षा तेजनकर यांनी विशेष लक्ष घालावे अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

केनवड येथील शेतकरी गुलाब लक्ष्मण दांडगे यांचा वहिवटीचा रस्ता सुमारे ९ ते १० महिन्यांपासून अडविण्यात आला असून, त्यामुळे शेतातील तूर, हरभरा व गहू घरी आणता येत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. सदर प्रकरण मामलेदार कार्यालयात प्रलंबित असून, गेल्या अनेक महिन्यांपासून केवळ तारखांवर तारखा दिल्या जात असल्याचे सांगण्यात आले.मा. तहसीलदारांच्या सूचनेनुसार स्थळ पाहणीसाठी सबंधित अधिकारी शेतात आले होते. या पाहणीदरम्यान पंचनामा करण्यात आला; मात्र तो एकतर्फी व अर्धवट असल्याचा आरोप सदर शेतकऱ्यांनी केला आहे. याच वेळी हक्काबाबत चर्चा सुरू असताना, सबंधित शेतकऱ्याने आमच्यावर अन्याय झाला तर, आम्हाला आत्महत्या करावी लागेल ! असे उद्विग्न अवस्थेत म्हटले आहे. मात्र यावर नायब तहसीलदार कुळमेथे यांनी करा मग.. असे उत्तर दिल्याने या प्रकरणाला वेगळी कलाटणी मिळाली आहे.परिणामी या विषयात तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. शेतकऱ्यांचा आरोप असा आहे की, पाहणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची पाहणी करण्याऐवजी शेतकऱ्यांशी बोलताना उद्धट, आरडाओरड करणाऱ्या व अंगावर गेल्यासारख्या भाषेत संवाद साधला. 'आत्महत्या करा' असे शब्द वापरताना संबंधित अधिकारी पदाची गुर्मी असल्यासारखे, माजात बोलत होते. शेतकऱ्यांशी सन्मानाने वागण्याऐवजी दडपशाहीच्या सुरात संवाद साधल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान शेतकऱ्यांनी स्वतः चित्रीत केलेले व्हिडिओ तसेच स्पॉट पंचनामा करतानाचे दृश्य व्हॉट्सअॅप ग्रुपवर फिरत असून, त्यामुळे रिसोड तहसील प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मात्र, या प्रकरणी अद्याप अधिकृत प्रशासनाकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. महत्त्वाचे म्हणजे, रिसोड तहसीलमध्ये नायब तहसीलदार शेतकरी व नागरिकांशी उद्धटपणे वागणुकीची ही एकमेव घटना नसून, यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक तक्रारी समोर आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे तहसील प्रशासनाच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले.

## थोडक्यात

### अनिल गावंडे मित्रमंडळाच्या वतीने भाविक भक्तांची सेवा



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळनाथ येथील तपस्वी संत बिरबलनाथ महाराज यांच्या यात्रेनिमित्त भाविक भक्तांना शिवराज मित्र मंडळाच्या वतीने नगर परिषदेचे उपाध्यक्ष अनिल गावंडे यांनी सेवा केली. सर्वप्रथम आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते भाविकांना पोहे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार तथा नगरसेवक ,प्रा.नंदलाल पवार सर नवनिर्वाचित नगरसेवक व मान्यवरांच्या हस्ते सुद्धा यावेळी भाविकांना पोह्याचे वाटप करण्यात आले. अनिल गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवराज मित्र मंडळ हे प्रत्येक उत्सवामध्ये मध्येभाग घेऊन कार्यक्रम साजरा करत असतात.

## पिक पाहणीत सहायकांचा जीव टांगणीला; ना विमा, ना मोबदला !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●




रब्बी हंगामातील ई- पिक पाहण्याची मुदत २४ जानेवारी रोजी संपली आहे. शासनाच्या ?पवर ऑनलाईन पिकाची नोंद घेण्याची जबाबदारी पिक पाहणी साहायकांवर आहे. एकल पिकासाठी प्रति त्लॉट १० रुपये, तर मिश्र पिकासाठी १२ रुपये मानधन देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र प्रत्यक्षात साहायकांना ना मानधन मिळाले, ना विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे कृषी सहायकांमध्ये असंतोष पसरला आहे.

शेत शिवारात जीव धोक्यात घालून पीक पाहणी करणाऱ्या साहायकांना गेल्या दीड ते दोन वर्षापासून मानधन मिळालेले नाही. इंधन, प्रवास, मोबाईल व इंटरनेट यासाठी स्वतःच्या खिशातून खर्च करूनही मोबदला न मिळाल्याने त्यांची आर्थिक कोंडी वाढली आहे. विशेष म्हणजे वन्य प्राण्याची भीती आणि अपघाताचा धोका असतानाही कोणतेही विमा संरक्षण नसल्याने पीक पाहणी, ही जबाबदारी साहायकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे बोलल्या जात आहे.

सहाय्यक स्तरावरील पीक पाहणीचा पुढील कार्यक्रम लवकरच सुरू होणार आहे, मात्र थकीत मानधनाचा या प्रक्रियेवर परिणाम होणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. कृषी सहायकाचे पुढील निर्णयाकडे लक्ष लागून आहे.

## अवैध देहव्यापार व अवैध व्यवसायामुळे नागरिक त्रस्त

### कारवाईची एकमुखी मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शहरातील बालाजी संकुल परिसरात अवैधरित्या सुरु असलेला देहव्यापार, गुन्हेगारी व अनैतीक कृत्यामुळे परिसरातील नागरीक व व्यापारी त्रस्त झाले आहेत. या परिसरात होणाऱ्या देहविक्रीच्या कृत्यावर बंदी करुन नागरीक व व्यापाऱ्यांना दिलासा देण्याची एकमुखी मागणी व्यापारी व नागरीकांनी केली आहे. यासंदर्भात सोमवार, २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी, नगर परिषद अध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

सदर निवेदनात नमुद आहे की, शहरातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून पाटणी चौकाचा भाग ओळखला जातो. त्यातच नजीकच्या बालाजी संकुलात कापड



इलेक्ट्रीकल्स, हार्डवेअर, किराणा, फुटवेअर, सोनार, मोबाईल शॉपी यासारख्या दुकानांसोबत विविध राष्ट्रीयकृत बँका असून त्यामुळे या भागात नागरीकांची खुप वर्दळ असते. असे असले तरी या बालाजी संकुल परिसरात सुरु असलेल्या अवैध देहव्यापाऱ्याच्या धंदयामुळे नागरीक व व्यापारी बांधवांना विविध प्रकारचा त्रास सहन करावा लागतो. तसेच या देहव्यापाराच्या धंदयामुळे पुरुष व महिला ग्राहक या भागात येण्यास



संकोच करतात. येथे येणाऱ्या नागरीकांना देहव्यापारातील महिला विनाकारण त्रास देतात. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया रस्त्यावर उभ्या राहून अश्लिल हावभाव करतात.

इतकेच नव्हे तर लहान मुले सुध्दा गुन्हेगारी व्यवसायाशी जोडली गेली असून येथे रोजच भानगडी, चोरीचपाटी व लुटमारीच्या घटना घडत आहेत. या सर्व कारणामुळे येथील व्यापारी, महिला व नागरीक त्रस्त झाले असून या देहव्यापाराला संरक्षण देणाऱ्या गुंड व्यक्तींकडून दादागिरी करुन व्यापाऱ्यांना धमकावले जात आहे.

अशा परिस्थितीत व्यापार करणेही मुश्कील झाले आहे. व्यापारी व दुकानदारांना होत असलेला हा त्रास पाहता देहव्यापार करणाऱ्या महिलांवर कठोर कारवाई करावी व हे अवैध व्यवसाय त्वरीत बंद करण्यासंदर्भात योग्य ती कायदेशीर कारवाई करुन नागरीक व व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. निवेदन देतांना वसंत परळकर, तेजस परळकर, राम लोहकरे, सौ. सविता कांबळे, सुरेश कांबळे, संतोष विश्वकर्मा, विजय शेळके, अमोल हेंद्रे, सैय्यद अतीक, उमेश मुंदडा आदी उपस्थित होते.

# लोणी बुद्रुक येथील जल जीवन मिशनचा बट्ट्याबोळ !

## विहिरीला मुबलक पाणी नसल्याने ठिकाण बदलण्याची सरपंच, सदस्यांची निवेदनाद्वारे मागणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेचा बट्ट्याबोळ झाला आहे.त्याला शासनाकडून निधीची कमतरता,तर काही ठिकाणी ठेकेदारांची मनमानी हे प्रमुख कारणे आहेत. त्यातीलच एक जिवंत उदाहरण म्हणजे रिसोड तालुक्यातील श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथील जल जीवन मिशन योजनेच्या विहिरीला पाणी नसल्याने अनेक वेळा ग्राम पंचायतच्या मासिक सभेत,ग्राम सभेत ठराव घेऊन प्रशासनाला सूचना केल्या परंतु त्याला केराची टोपली दाखवण्यात आली. शेवटी ग्राम पंचायत सरपंच व सदस्यांनी जिल्हा प्रशासनाचे उंबरठे गाठत आपली समस्या मांडली.

ग्राम पंचायत लोणी बुद्रुक येथे जल जीवन मिशन योजना मंजूर झाल्यानंतर विहिरीचे खोदकाम करण्यात आले.परंतु त्या विहिरीला मुबलक पाणी न लागल्याने ग्राम पंचायत प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला विहीर बांधकाम न करता विहिरीसाठी नवीन जागी विहीर घेण्याच्या सूचना केल्या परंतु ठेकेदाराने आपली मनमानी करत तालुका पातळीवरील अधिकारी,कर्मचारी यांना हाताशी धरून थातूर मातुर बांधकाम पूर्ण करत जवळपास एक कोटी रुपये रक्कम काढल्याची माहिती समोर आली आहे.लोणी बुद्रुक वासियांचे 'हर घर नल, हर घर जल' चे स्वप्न अपूर्णच राहिले आहे. याही वर्षी लोणी बुद्रुक ग्रामस्थांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचं संकट गडद झाले आहे.यावर सरपंच,सदस्यांनी आक्रमक होत जिल्हाधिकारी,तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांना निवेदन देत आपली कैफियत मांडली आहे. आता जिल्हा प्रशासन काय भूमिका घेते. याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



आमच्या गावाला आतापर्यंत जलस्वराज,भारत निर्माण, यासारख्या योजना मंजूर होऊन पूर्ण झाल्या त्यावर लाखो रुपये खर्चा झाले. परंतु गावकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला नाही.आता जल जीवन मिशन योजना त्याच मार्गाने चालली आहे. यावर ठोस निर्णय न झाल्यास येत्या काळात गावकरी आंदोलन करणार आहोत.

**गीता उद्धवराव बोडखे**
**ग्राम पंचायत सदस्य**

लोणी बुद्रुक येथील जल जीवन च्या विहिरीला पाणी नाही. शिवाय ती विहिर तलावात असल्याने साचिव हिरवेगार पाणी त्यामध्ये जमा झाले असल्याने विहिरीसाठी नवीन जागा बदलून योजना पुढे नेण्याची गरज आहे.कित्येकवेळा आम्ही स्थानिक प्रशासनाकडे विनंती केली मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.म्हणून आम्ही जिल्हा प्रशासनाकडे लेखी तक्रार केली आहे.

**विजया भास्कर नरवाडे**
**सरपंच लोणी बुद्रुक**

लोणी बुद्रुक येथील जल जीवन मिशन योजना माझ्या कार्यकाळात सन २०२३ मध्ये मंजूर झाली. त्यावेळी आम्ही विहिरीचा स्पॉट वेगळ्या ठिकाणी दिला होता.नंतर संबंधित विभागाने आणि ठेकेदाराने परस्पर स्पॉट बदलला त्या ठिकाणी खोदकाम केले त्याला पाणी नसल्याने आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

**सविता प्रवीण बोडखे**
**माजी सरपंच लोणी**

लोणी बुद्रुक येथील जल जीवन मिशन योजना अंतर्गत विहीर खोदकाम,बांधकाम पूर्ण झाले असून संबंधित ठेकेदाराला त्यावर पंप बसवून विहिरीला पाणी आहे किंवा कसे याची चाचणी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.जर या विहिरीला मुबलक पाणी उपलब्ध झाले नाही तर शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार योग्य त्या उपाय योजना करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**राम चापे उपअभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा रिसोड**

आमच्या गावाला आतापर्यंत जलस्वराज,भारत निर्माण, यासारख्या योजना मंजूर होऊन पूर्ण झाल्या त्यावर लाखो रुपये खर्चा झाले. परंतु गावकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला नाही.आता जल जीवन मिशन योजना त्याच मार्गाने चालली आहे. यावर ठोस निर्णय न झाल्यास येत्या काळात गावकरी आंदोलन करणार आहोत.

**गीता उद्धवराव बोडखे , ग्राम पंचायत सदस्य**

लोणी बुद्रुक येथील जल जीवन च्या विहिरीला मुबलक पाणी नाही. शिवाय ती विहीर तलावात असल्याने साचिव हिरवेगार पाणी असल्याने एवढ्या पाण्यावर गावाची कायम स्वरुपी तहान भागू शकत नाही.परिणामी योजना मृगजळा सारखी होण्याची भीती गावकऱ्यांच्या मनात आहे.ठेकेदाराला आपल्या नावावर काम कुठे चालू आहे याची माहिती सुद्धा नाही. गावकऱ्यांचा पिण्याचा पाण्याचा कायम स्वरुपी प्रश्न मार्गी लागावा यासाठी मुबलक पाण्याचा स्त्रोत निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. यावर ठोस निर्णय न झाल्यास जण आंदोलन उभारण्यात येणार आहे.

**विनोद पाटील बोडखे , ग्राम पंचायत सदस्य लोणी बुद्रुक**

## हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ !

### संत श्री बिरबलनाथ महाराज यात्रोत्सवास सुरुवात



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

येथील योग तपस्वी संत श्री बिरबलनाथ महाराज यांच्या यात्रोत्सव निमित्त दि ६ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी मान्यवरांच्या उपस्थितीत घेतला.

महाआरती नंतर बिरबलनाथ महाराज मंदिरा मध्ये महिला व पुरुष अश्या दोन लाईन बारी मधून महाप्रसादाचे वितरण उशिरापर्यंत सुरू होते. यावेळी आमदार श्याम खोडे, नगरसेवक प्रा.विरेंद्रसिंह ठाकूर, प्रा. नंदलाल पवार,सुधीर घोडचर, संस्थानच्या अध्यक्षा पुष्पा रघुवंशी, सचिव रामकुमार रघुवंशी,कृष्णासिंह रघुवंशी, उत्तम पाटील, तिवारी महाराज, राजू जयस्वाल,प्रकाश संगत, बाळूदिवेकर, राजकूमारठाकूर, सूधाकर क्षीरसागर,राजेश दबडे, नारायण अव्हाळे, रमेश मुंजे, सचिन राणे, आदींची उपस्थिती होती. महाप्रसाद वितरण शांततेत पार पडावे यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर,पोलीस निरीक्षक किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनात चोख पोलीस बंदोबस्त होता.

तसेच महाप्रसाद वितरण स्थळी समस्त राजपूत समाज बांधव, शिवरत्न मित्र मंडळ व भावी भक्तांकडून पाणी बॅरल ची व्यवस्था करण्यात आली होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि.८ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# ‘गण-गण गणात बोते’ च्या जयघोषाने गुंजली अकोला नगरी...!

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**अकोलाः** संत शिरोमणी श्री गजानन महाराज आणि अकोला वासियांचे एक अतूट नाते आहे . पंढरपूरला जाणाऱ्या गजानन महाराजांच्या पालखीचे जेवढे अकोला शहरात स्वागत होते तेवढे कुठेही होत नाही. दर गुरुवारी अकोला शहरातून शेगावला पैदल वारी करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. जेवढ्या उत्साहात संत नगरी शेगाव मध्ये गजानन महाराजांचा प्रगट दिन साजरा केला जातो त्याचप्रमाणे अकोला शहरातही मोठ्या प्रमाणात प्रगट दिन साजरा केला जातो शहरातील श्री संत गजानन महाराजांच्या मंदिरातच नव्हे तर घरोघरी सुद्धा संत गजानन महाराजांना त्यांच्या आवडत्या पिठलं भाकरीचा नैवेद्य दिला जातो.आज रविवारी, संत गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त अकोला शहर संपूर्णपणे श्री गजानन भक्तीत बुडाले होते.











संपूर्ण शहरात श्रद्धा, उत्साह आणि भक्तीचे अद्भुत वातावरण दिसून आले. या निमित्ताने शहरात १ फेब्रुवारीपासून सुरू झालेला श्रीमद् भागवत कथा स्वतःची समाप्ती गोपालकाला व कीर्तनाने करण्यात आली. अकोला शहरातील जुने शहर डाबकी रोड जठार पेठ उमरी गोरक्षण रोड रामदास पेठ मोठे राम मंदिर बिर्ला राम मंदिर मुकुंद पेठ परिसरातील श्री गजानन महाराज मंदिर जठार पेठ परिसरातील श्री गजानन महाराज मंदिर तसेच अनेक शेकडो मंदिरांमध्ये महाराजांचा प्रगट दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

श्रींच्या प्रगट दिनानिमित्त संत गजानन महाराज मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काहीं मंदिरांमध्ये श्रीमद् भागवत कथा, तर काही मंदिरांमध्ये श्री राम कथा आणि घरोघरी नियमित गजानन महाराजांच्या विजय ग्रंथाचे पारायण करण्यात आले, रविवारी गोपाळकाला आणि महाप्रसाद वाटपाने या सर्व कार्यक्रमांचा समारोप करण्यात आला. शहरातील सर्वच गजानन महाराज मंदिरांच्या विश्वस्तांनी शक्य तितक्या भाविकांना या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन आधीच केले होते. अनेक मंदिर परिसरात तसेच ज्या भाविकांनी श्रींच्या प्रगट दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले होते त्या ठिकाणी अत्यंत श्रद्धेने महाप्रसाद ग्रहण करण्यासाठी भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने रांगा लावल्याचे दिसून आले काही ठिकाणी तर महाप्रसादाचे वितरण स्वरूची भोज पद्धतीने करण्यात आले आज प्रगट दिनानिमित्त अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन असल्याने काहीजणांनी जेवायला भाविक कमी येतील या भीतीने आपल्या महाप्रसादाचे आयोजन पुढे ढकलले आहे एकंदरीतच या पुढील सप्ताहात अनेक ठिकाणी महाप्रसादाच्या आयोजनाची धूम पाहावयास मिळेल







## असाध्य रोगांवर डॉक्टर नाईक होमिओपॅथी हॉस्पिटलमध्ये योग्य उपचार

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी




**अकोलाः** जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात प्रसिद्ध असलेल्या डॉक्टर नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात या ठिकाणी ?डव्हान्स होमिओपॅथी उपचार रुग्णांसाठी गुणकारी ठरत आहेत त्यामुळे

दुर्धर आजाराच्या रूग्णांना लाभ झाल्याचा दावा येथे उपचार घेणारे रुग्ण करीत आहेत. डॉक्टर नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड , लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्स होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे.

गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी. याकरिता मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३००१६१२९ व Naikhomoeopathy. com (Youtube) वर माहिती घ्यावी. असे आवाहन करण्यात येत आहे. डॉक्टर नाईक होमिओपॅथी मध्ये उपचार घेतलेल्या भाग्यश्री नामक महिलेने सांगितले की त्यांचे वजन अचानक वाढले होते संपूर्ण अंगावर सूज चढली होती नेहमी अंग दुखीचा सामना त्यांना करावा लागत असे परंतु नाईक होमिओपॅथी येथे उपचार सुरू केल्यानंतर केवळ चार महिन्यातच त्यांचे वजन ९ किलोने कमी झाले असून त्यांच्या शरीरावरील सूज कमी झाली आहे डॉक्टर नाईक होमिओपॅथी हॉस्पिटल मध्ये उपचार घेतल्यानंतर त्या अत्यंत समाधानी असल्याचे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय महामार्गावर ट्रक दरीत कोसळून चालकासह क्लिनर ठार

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर :** नागपूर-मुंबई राष्ट्रीय कुरुम शिवाय ताहामार्गावरील कुकूल दरीत शुक्रवारी रात्री आयशर ट्रकचा पडून भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये चालक व क्लिनर जागीच ठार झाल्याची घटना घडली.

एमएच-२९-बीएफ-६०७४ क्रमांकाचा आयशर नागपूर येथून संभाजीनगरकडे लोखंडी पाइप घेऊन जात होता. दरम्यान, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्यावरील डव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेला जाऊन पुलाजवळील खोल दरीत कोसळला. अपघाताच्या तीव्र धक्क्याने ट्रकमधील लोखंडी पाइप केबिनमध्ये घुसून चालक अनिसउद्दीन रफिकउद्दीन काझी व, क्लिनर मोहम्मद रेहान मोहम्मद नाजिम दोघेही रा. जोहर नगर, बुलडाणा यांच्या अंगावर पडले. यामध्ये या दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच माना पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मूर्तिजापूर येथील लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालय आणण्यात आले असून, पुढील तपास ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दीपक सोळंके करीत आहेत.

## पाणी आणि शौचालयांच्या अभावात कशी द्यायची बोर्डाची परीक्षा? विद्यार्थ्यांसाठी सुविधांचा अभाव हा चिंतेचा विषय

प्रतिनिधी ८ फेब्रुवारी



**अकोलाः** राज्यात दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. दहावीच्या लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान होतील. बारावीच्या लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान होतील. विद्यार्थी परीक्षेच्या तयारीत पूर्णपणे गुंतले आहेत, तरीही अनेक प्राथमिक, माध्यमिक, सरकारी आणि खाजगी शाळांमध्ये मूलभूत सुविधांच्या अभावाचे भयानक चित्र समोर येत आहे.

विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या मते, अनेक शाळांमध्ये अजूनही पुरेसे पिण्याचे पाणी नाही. काही भागात नळ कोरडे आहेत, तर काही भागात पाण्याच्या टाक्या खराब स्थितीत आहेत. अनेक शाळांमध्ये स्वच्छ आणि पुरेशी शौचालये नाहीत. चिंताजनक परिस्थिती अशी आहे की अनेक शाळांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बांधलेली शौचालये कुलूपबंद आहेत, ज्यामुळे दिव्यांग मुलांना मोठी गैरसोय होणार आहे. काही शाळांमध्ये शौचालयांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे अनेक शौचालयांना दरवाजे नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे.पालकांचे म्हणणे आहे की मुलांवर आधीच अभ्यास आणि परीक्षांचे ओझे आहे. याशिवाय, पाणी, स्वच्छता आणि सुरक्षितता यासारख्या समस्या त्यांच्या आरोग्यावर आणि मनोबलावर नकारात्मक परिणाम करू शकतात. विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि अनुकूल वातावरण सुनिश्चित करण्यासाठी सर्व शाळांमध्ये तपासणी केली पाहिजे. याकरिता शिक्षण विभागाने बोर्ड परीक्षा आधी शाळांची तपासणी करीत विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा कशा मिळतील याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे

## शेगावात उसळला भक्तांचा जनसागर...



**शेगाव :** शनिवार सकाळपासूनच संतनगरीत भजनी दिंड्या व पायी वारकरी येण्याचा ओघ चालू होता. “श्री गजानन अवलिया अवतरले जग ताराया...” या अभंगाचे टाळ मृदंगाच्या निनादात गायन करीत भजनी दिंड्या संत नगरीत दाखल होत होत्या. दर्शनासाठी भक्तांना असुविध होऊ नये, यासाठी वनवे एकरी मार्ग करण्यात आला होता. त्यामध्ये श्रींची समाधी दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप आदी व्यवस्था करण्यात आली होती.



### श्रींच्या संदेशाचे पालन

‘अन्न वाया घालू नका’ या श्रींच्या संदेशाचे सेवाधारींसह भाविकही तंतोतंत पालन करीत असल्याचे ठिकठिकाणी दिसून येत होते. आपल्याला हवे तेवढेच घेऊन भाविक अन्नाचा आदर करीत होते. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन भाविक भक्तांसाठी करण्यात आले होते. मात्र त्या ठिकाणीही अन्नाची नासाडी होताना दिसत नव्हती.

### सेवाभावी संस्थांचा पुढाकार

संतनगरीत जागोजागी चहा, पाणी, फराळाची व्यवस्था करण्यासाठी सेवाभावी झटत होते. घ्या माऊली महाप्रसाद म्हणत आग्रहाने वारकऱ्यांना नाश्ता देत होते. विशेष म्हणजे सर्वत्र स्वच्छता राखत होते. कोठेच इतरत्र कचरा दिसत नव्हता. त्यामुळे भाविकही नाश्ता झाल्यानंतर शिस्ती आपली प्लेट, कप डस्टबीनमध्ये टाकत असल्याने कोठेच घाण दिसत नव्हती.

## श्री शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी परिषद

**अकोला :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे आयक्यूएसी व आरएसी यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान व तंत्रज्ञान या विषयावर आयोजित एकदिवसीय विद्यार्थी परिषद मोठ्या उत्साहात झाली. राज्यभरातून तब्बल ७०० पदवी, पदव्युत्तर व संशोधन स्तरावरील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ तर उद्घाटक म्हणून आयआयटी मुंबई येथील रसायनशास्त्र विभागाचे डॉ. संजोग नगरकर उपस्थित होते. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावतीचे प्राचार्य डॉ. गजानन कोरपे, प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. आशिष राऊत, आरएसी समन्वयक डॉ. दीपक कोचे व विज्ञान विभाग समन्वयक डॉ. नितीन मोहोड उपस्थित होते. डॉ. आशिष राऊत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांनी स्वागत केले.

CLASSIFIED
पाहिजेत...!
ITI CNC Operator
Coreldraw Designer/ Photoshop
Salse Executive
कंपनीमध्ये पाहिजे आहे.
पगार अनुभवाप्रमाणे 9 ते 12 हजार
-: पत्ता:-
बोर्ड वाला डॉटकॉम
सातूर्णा एमआयडीसी, अमरावती
इच्छुकांनी Resume Whatsapp करावा
9172914161
valbhav bobade Boardvala.com

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK